दैनिक

https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

# समर्थ राजयोग

SAMARTH RAJYOG

वैभव विवेक स्वामी
संपादक

राजमान्य, राजशक्ती

No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष - ६ वे अंक -३४१ बुधवार दि.१९ ऑगस्ट २०२६ 98 22 62 85 21 आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रु । पाने ४

Beed Daily Marathi Year-6th Issue-341 Wednesday, Dt.19 August 2026 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4


# जायकवाडी टप्पा-२ ला ६,४७७ कोटींची मंजुरी!

## सर्वाधिक बीडसह पाच जिल्ह्यांतील १ लाख ३१ हजार ६५२ हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा मोठा लाभ..!!

बीड / वैभव स्वामी

मराठवाड्याच्या सिंचनाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेल्या जायकवाडी प्रकल्प टप्पा-२ साठी ६ हजार ४७७ कोटी ८८ लाख रुपयांच्या पाचव्या सुधारित प्रशासकीय मान्यतेला मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या निर्णयामुळे गोदावरी खोऱ्यातील सिंदफणा नदीवरील माजलगाव धरणाच्या कामाला गती मिळणार आहे.

जायकवाडी प्रकल्पाचे दोन टप्प्यांत नियोजन करण्यात आले असून पहिल्या टप्प्यातील धरण व २०८ किलोमीटर लांबीचा पैठण डावा कालवा तसेच संबंधित कालव्यांची कामे पूर्ण झाली आहेत. आता टप्पा-२ मधील कामांना मिळालेल्या सुधारित प्रशासकीय मान्यतेमुळे मराठवाड्यातील सिंचन विस्ताराला मोठी चालना मिळण्याची अपेक्षा आहे.

जायकवाडी टप्पा-२ अंतर्गत बीडसह छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, परभणी आणि नांदेड या पाच जिल्ह्यांतील एकूण १ लाख ३१ हजार ६५२ हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा लाभ मिळणार आहे. यामध्ये बीड जिल्ह्याचा मोठा वाटा असून पैठण उजवा कालवा, माजलगाव उजवा कालवा आणि साळींबा ठिबक उपसा सिंचन योजनेतून बीडच्या एकूण ७२ हजार ४८५ हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा लाभ मिळणार आहे.




### कोणत्या जिल्ह्याला किती लाभ.?

बीड : ७२,४८५ हेक्टर
परभणी : ४४,४०८ हेक्टर
नांदेड : ११,३३७ हेक्टर
छत्रपती संभाजीनगर : १,७३२ हेक्टर
अहिल्यानगर : १,६९० हेक्टर
एकूण : १,३१,६५२ हेक्टर

### माजलगाव धरणाची साठवण क्षमता ४५४ दलघमी

प्रकल्पांतर्गत ४५४ दशलक्ष घनमीटर साठवण क्षमतेचे माजलगाव धरण अस्तित्वात येणार आहे. तसेच माजलगाव-लोणी सावंगी उपसा योजना, साळींबा ठिबक उपसा योजना, शिरस मार्ग निम्नपातळी बंधारा, रोशनपुरी उच्चपातळी बंधारा आणि १४८ किलोमीटर लांबीचा माजलगाव उजवा कालवा यांसह विविध कामांचा समावेश आहे.

### ६,४७७ कोटींच्या निधीतून प्रमुख कामे

- पैठण उजवा कालवा - ८६०.२३ कोटी
- माजलगाव धरणाची उर्वरित कामे - १,२२३.४५ कोटी
- माजलगाव उजवा कालवा - ४,३९४.२० कोटी

# फातेमानगरात अस्वच्छतेचे साम्राज्य, नागरिकांचा संताप




## तुंबलेल्या नाल्या, मृत जनावरे आणि फुटलेल्या जलवाहिनीमुळे दुहेरी संकट, तातडीने उपाययोजनेची मागणी

माजलगाव ।प्रतिनिधी

माजलगाव नगरपरिषद हद्दीतील प्रभाग क्रमांक २ मधील फातेमानगर परिसरात स्वच्छतेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. तुंबलेल्या नाल्या, रस्त्यावर अनेक दिवसांपासून पडलेली मृत जनावरे आणि साचलेल्या सांडपाण्यामुळे दुर्गंधी पसरली असून नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. डेंग्यू, मलेरिया यांसारख्या साथीच्या आजारांची भीती नागरिकांनी व्यक्त केली आहे.

यासोबतच मोठी जलवाहिनी अनेक दिवसांपासून फुटल्याने नळाला पाणी येत नसून, पाण्यासाठी नागरिकांना जागोजागी खड्डे खोदावे लागत आहेत. वारंवार तक्रारी करूनही ठोस उपाययोजना होत नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

नाल्यांची तातडीने स्वच्छता, मृत जनावरांची विल्हेवाट, नियमित स्वच्छता मोहीम आणि फुटलेल्या जलवाहिनीची कायमस्वरूपी दुरुस्ती करण्याची मागणी नागरिकांनी नगरपरिषद प्रशासन व नगरसेवकांकडे केली आहे. फातेमानगरचा स्वच्छता व पाणीप्रश्न प्रशासन कधी सोडवणार ?असा सवाल नागरिकांतून उपस्थित होत आहे.

# अंबड-घनसावणी तहसील कार्यालयात जन्म-मृत्यूच्या संचिका वर्षभर धूळखात

## नव्या कायदेशीर तरतुदींच्या संभ्रमामुळे नागरिकांची ससेहोलपट, 'कर कुटाणा अन् हातात फुटाणा' अशी अवस्था

जालना ।प्रतिनिधी

अंबड-घनसावणी तहसील कार्यालयात जन्म-मृत्यू नोंदणीसाठी दाखल केलेल्या अनेक संचिका १२ मार्च २०२५ पासून प्रलंबित असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. आवश्यक कागदपत्रे जमा करून तीन-चार हजार रुपये किंवा त्याहून अधिक खर्च करूनही वर्षभर निर्णय न झाल्याने नागरिकांना वारंवार कार्यालयाच्या फेऱ्या माराव्या लागत आहेत.

नव्या कायदेशीर तरतुदींमुळे जुन्या प्रलंबित संचिकांचे काय होणार, पुन्हा कागदपत्रे, प्रतिज्ञापत्रे व नवीन संचिका करावी लागणार का, असा सवाल नागरिक उपस्थित करीत आहेत. काही

*कर कुटाणा अन् हातात फुटाणा:: अंबड-घनसांवगी तहसील कार्यालयात जन्म-मृत्यू संचिका धूळखात




प्रकरणांत न्यायालयीन प्रक्रियेची आवश्यकता असल्याचे सांगितले जात असले तरी संबंधित नागरिकांना त्याबाबत स्पष्ट मार्गदर्शन मिळत नसल्याच्या तक्रारी आहेत.

जन्मदाखला विद्यार्थ्यांच्या प्रवेश, शिष्यवृत्ती, आधार व विविध शासकीय योजनांसाठी आवश्यक असल्याने विलंबामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होण्याची भीती आहे. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांनी १२ मार्च २०२५ पासून प्रलंबित सर्व संचिकांची स्वतंत्र यादी करून प्रत्येक प्रकरणाची सद्यस्थिती जाहीर करावी, डेडलाइन निश्चित करून विशेष मोहीम राबवावी आणि विद्यार्थ्यांच्या प्रकरणांना प्राधान्य द्यावे, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

'कर कुटाणा अन् हातात फुटाणा' अशी अवस्था होऊ नये, यासाठी प्रशासनाने तातडीने कार्यवाही करून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# महात्मा ज्योतिराव फुले महसूल लोक अदालतीतून प्रलंबित प्रकरणांना मिळणार गती

बीड ।प्रतिनिधी

महसूल विषयक प्रलंबित प्रकरणांचा जलद व नियमानुसार निपटारा करण्यासाठी १ सप्टेंबर २०२६ ते ३१ मार्च २०२७ या कालावधीत महात्मा ज्योतिराव फुले महसूल लोक अदालत अभियान राबविण्यात येणार आहे. नागरिकांनी प्रलंबित प्रकरणांबाबत संबंधित महसूल कार्यालयाशी संपर्क साधून आवश्यक कागदपत्रे सादर करावीत, असे आवाहन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले.

अभियानांतर्गत कायदेशीर प्रक्रियेतून निकाली काढता येणाऱ्या प्रकरणांवर विशेष लक्ष दिले जाणार आहे. अपर जिल्हाधिकारी हरिश धार्मिक यांनी प्रकरणांची छाननी करून आवश्यक अभिलेख पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या आहेत. उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांनी नागरिकांनी आपल्या प्रकरणाची सद्यस्थिती जाणून घेऊन कागदपत्रांची पूर्तता करण्याचे आवाहन केले.दर तीन महिन्यांनी प्रत्येक मंडळ स्तरावर लोक अदालतीचे आयोजन केले जाणार आहे. निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली अभियानाचे नियोजन सुरू आहे. तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी नागरिकांनी अनधिकृत मध्यस्थांवर अवलंबून न राहता संबंधित महसूल कार्यालयाशी थेट संपर्क साधण्याचे आवाहन केले.जमीन हक्क, फेरफार, वाटणी, रस्ते व सीमावाद यांसारख्या प्रकरणांच्या निपटाऱ्याला या अभियानामुळे गती मिळण्याची अपेक्षा आहे.

# दुर्लक्षित राष्ट्रभक्त कवी दरबार खान यांच्या साहित्याला न्यायाची अपेक्षा

## 'दरबान' काव्यसंग्रह व 'बेटा हिंदुस्तान का' कवितेतून देशभक्तीचा जागर

जालना / शेख फारुक

भोकरदन तालुक्यातील कुंभारी येथील राष्ट्रभक्त कवी दरबार खान यांच्या साहित्य व देशभक्तीपर कार्याची पुन्हा एकदा चर्चा सुरू झाली आहे. मराठवाडा विद्यापीठाने प्रकाशित केलेला 'दरबान' काव्यसंग्रह आणि 'बेटा हिंदुस्तान का' ही कविता आजही प्रेरणादायी असल्याने त्यांच्या साहित्याला योग्य न्याय मिळावा, अशी मागणी होत आहे.

कय्युमबेग मिर्झा यांनी 'रिलेटिव्ह महाराष्ट्र' व्हॉट्सप समूहावर दरबार खान यांच्या कार्याची माहिती शेअर केल्यानंतर ही चर्चा पुढे आली. दरबार खान यांनी १९८४-८५ पासून देशभक्तीपर कविता, गीत



व राष्ट्रीय एकात्मतेच्या कार्याला वाहून घेतले. १९८७ मध्ये डॉ. म. द. राजूरकर यांच्या हस्ते 'दरबान'चे प्रकाशन झाले. या संग्रहात ४० देशभक्तीपर कविता आहेत.त्यांच्या गीतांचे आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर केंद्रावर प्रसारण झाले असून २००६ मध्ये टी-सीरिजच्या 'वीर तुझे सलाम' अल्बममध्येही त्यांच्या कार्याचा समावेश झाला. कुमार सानू, मोहम्मद अजीज, वैशाली सामंत, विनोद राठोड व प्रमोद सरकटे यांनी पार्श्वगायन केले.

दरबार खान यांनी देशप्रेमी भारत यात्रा व प्रबोधनाच्या माध्यमातून महाराष्ट्रासह राजस्थान, पंजाब, जम्मू-काश्मीर, बिहार व मध्यप्रदेशात राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश दिला. नरेंद्र मोदी, कृष्णपाल गुर्जर, अनिल देशमुख, फौजिया खान, रावसाहेब दानवे यांच्यासह विविध मान्यवर व संस्थांनी त्यांच्या कार्याचे कौतुक केले आहे.

'दरबान'चे पुनर्मुद्रण, 'वीर तुझे सलाम' अल्बम डिजिटल माध्यमावर उपलब्ध करून देणे आणि त्यांच्या रचनांचा शालेय-महाविद्यालयीन अभ्यासक्रमात समावेश करण्याची मागणी कय्युमबेग मिर्झा यांनी केली आहे.



# 'सरकारचे शैक्षणिक धोरण हेच विद्यार्थ्यांचे मरण', बीडमध्ये निदर्शने

बीड ।प्रतिनिधी

कमी पटसंख्येच्या शाळा बंद करण्याच्या निर्णयाविरोधात जिल्हाधिकारी कार्यालयासमोर डॉ. गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली निदर्शने करताना आंदोलक. यावेळी शेख युनूस, मुबीन शेख, अशोक येडे, सादेक सय्यद, बाळासाहेब मोरे पाटील, किष्किंधा पांचाळ, नितीन सोनवणे, भीमराव कुटे, हनुमान घोडके, अ‍ॅड. प्राचार्य राजकुमार कदम, प्राचार्य डी. जी. तांदळे, डॉ. संजय तांदळे, बाजीराव ढाकणे, राजेंद्र आमटे, प्रा. ज्ञानेश्वर राऊत, पठाण रफिक, विठ्ठल डोळस आदी सहभागी होते. बीड जिल्ह्यातील ६५ शाळांमध्ये एकच शिक्षक असल्याने अतिरिक्त शिक्षकांची नियुक्ती व विद्यार्थी संख्येनुसार पदमान्यता देण्याची मागणी करण्यात आली.



जालना / शेख फारुक

पत्रकारिता क्षेत्रातील प्रदीर्घ व उल्लेखनीय योगदानाबद्दल ज्येष्ठ पत्रकार अंकुशराव देशमुख (अप्पा) यांना बाळशास्त्री जांभेकर जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. जालना येथील मातोश्री लॉन्स येथे इंडियन जर्नालिस्ट असोसिएशनच्या वतीने आयोजित ९ व्या आंतरराष्ट्रीय पत्रकार संमेलन व पुरस्कार सोहळा-२०२६मध्ये हा गौरव करण्यात आला.

# आरोग्यसेवेपासून शिक्षणसेवेपर्यंत डॉ. तुकाराम नेहरकर यांची समाजसेवा






बीड ।प्रतिनिधी

घाटशिळ पारगाव येथील दत्तक घेतलेल्या दोन शाळांमध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. तुकाराम भानुदास नेहरकर. यावेळी विद्यार्थ्यांना कॉपीमुक्ती व व्यसनमुक्तीची शपथ देण्यात आली. शाळेला ई-लर्निंग बोर्ड तसेच कै. मातोश्री भीमाबाई नेहरकर यांच्या स्मृतीप्रित्यर्थ एक हजार विद्यार्थ्यांना रजिस्टरचे वाटप करण्यात आले. तसेच बीड येथील आरोग्य शिबिरात वरिष्ठ जागतिक आरोग्य सल्लागार नितीन भागवत, सौ. रोहिणी भागवत, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या मराठवाडा विभागीय महिला अध्यक्ष आयेशा शेख, चैताली आगलावे आदी उपस्थित होते.


शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!

Bureau of Indian Standards
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन

दहिवाळ
सुवर्णकार

नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777

शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

## संपादकीय....

# पावसाळ्यात पोटाचे संक्रमण टाळा

पावसाळ्यात, दमटपणा आणि साचलेल्या पाण्यामुळे जीवाणू, विषाणू आणि बुरशी यांची झपाट्याने वाढ होते. पाण्याचे स्रोत सहजपणे दूषित होऊ शकतात आणि दमट हवेमुळे अन्न लवकर खराब होते. त्याच वेळी, या हवामानात आपली पचनक्रिया मंदावते, ज्यामुळे पोट अधिक संवेदनशील बनते. दूषित पाणी आणि अन्नातील जंतू यांमुळे पोटाचे विकार, अन्नविषबाधा, जुलाब, उलट्या आणि कावीळसारख्या आजारांचा धोका वाढतो. त्यामुळे या दिवसांत खाण्यापिण्याच्या सवयींकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. अन्नसुरक्षेचे नियम पाळण्याबरोबरच रोगप्रतिकारशक्ती मजबूत ठेवली, तर अनेक संसर्गजन्य आजारांपासून संरक्षण मिळू शकते. सुरक्षित पाणी आणि ताजे अन्न महत्त्वाचे पावसाळ्यात नेहमी उकळलेले, गाळलेले किंवा शुद्ध केलेले पाणीच प्यावे. बाहेर मिळणारे पाणी वापरणे टाळावे. घराबाहेर जाताना स्वतःची पाण्याची बाटली बरोबर ठेवणे ही चांगली सवय आहे.

रस्त्यावरील उघडे खाद्यपदार्थ, आधीच कापलेली फळे आणि सॅलड खाणे शक्यतो टाळावे. घरचे ताजे आणि गरम अन्न हा सर्वात सुरक्षित पर्याय ठरतो. शिळे किंवा दीर्घकाळ साठवलेले अन्न खाणे टाळावे. अन्नाच्या गुणवत्तेबाबत शंका असल्यास ते फेकून देणे अधिक योग्य ठरते.फळे-भाज्या स्वच्छ धुवा पालेभाज्या आणि फळांवर चिखल, जंतू किंवा सूक्ष्म कीटक असू शकतात. त्यामुळे त्या वाहत्या पाण्याखाली नीट धुवाव्यात. शक्य असल्यास काही वेळ मिठाच्या पाण्यात भिजवून ठेवाव्यात. भाज्या कच्च्या खाण्याऐवजी शिजवून खाल्ल्यास संसर्गाचा धोका कमी होतो. स्वयंपाकघराची स्वच्छता आवश्यक दमट वातावरणामुळे स्वयंपाकघरात जंतू आणि बुरशी वाढण्याची शक्यता अधिक असते. स्वयंपाकाची जागा, भांडी आणि अन्नसाठा स्वच्छ व कोरडा ठेवावा. अन्न नेहमी झाकून ठेवावे आणि कोरडे पदार्थ हवाबंद डब्यांत साठवावेत.प्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी काय कराल? मजबूत रोगप्रतिकारशक्ती शरीराला संसर्गाविरुद्ध लढण्यास मदत करते. त्यामुळे आहारात जीवनसत्त्वांनी समृद्ध मोसमी फळे, भाज्या, लिंबूवर्गीय फळे, आवळा, आले, लसूण, हळद आणि तुळस यांचा समावेश करावा. गरम सूप, हर्बल चहा आणि ताजे, पचायला हलके घरगुती अन्न अधिक लाभदायक ठरते.पावसाळ्यात तहान कमी लागत असली तरी पुरेसे पाणी पिणे आवश्यक आहे. कोमट किंवा सामान्य तापमानाचे पाणी आणि हर्बल पेये शरीरातील पाण्याचे संतुलन राखण्यास मदत करतात.नियमित हलका व्यायाम, पुरेशी झोप आणि तणावमुक्त जीवनशैलीही प्रतिकारशक्ती वाढविण्यासाठी महत्त्वाची आहे. तसेच हात वारंवार धुणे, पावसात भिजल्यानंतर लगेच कोरडे कपडे घालणे आणि परिसर स्वच्छ ठेवणे या सवयींमुळे संसर्गाचा धोका कमी होतो.

कोणती लक्षणे धोक्याची? काही वेळा योग्य काळजी घेऊनही संसर्ग होऊ शकतो. सतत उलट्या किंवा जुलाब, न उतरणारा ताप, तीव्र पोटदुखी, निर्जलीकरण, डोळे किंवा त्वचा पिवळी पडणे आणि तीव्र अशक्तपणा अशी लक्षणे दिसल्यास तातडीने डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

---

**तहसील कार्यालय, कळंब**
**जा.क्र.२०२६/मह/दंडणीय/कावी-४९४**
**दिनांक १६/०७/२०२६**

## जाहिर प्रगटन

समस्त गावकरी शिराढोण ता.कळंब जि.धाराशिव यांना कळविण्यात येते की, या कार्यालयात ग्रामपंचायत अधिकारी शिराढोण ता. कळंब यांचे मार्फत पठाण जावेदखाँ खासदखाँ रा. शिराढोण ता. कळंब जि. धाराशिव यांचे जन्म प्रमाणपत्र मिळणेबाबत विनंती केली आहे.

प्रमाणपत्र धारक जावेदखाँ खासदखाँ रा. शिराढोण ता. कळंब जि. धाराशिव यांचे गाव शिराढोण हे असून सदर व्यक्तीचा शिराढोण ता.कळंब जि.धाराशिव या ठिकाणी दि. ०१/०६/१९७८ रोजी जन्म झाला असून जन्म प्रमाणपत्र मिळणेसंबंधी सदरील कार्यालयात ग्रामपंचायत अधिकारी शिराढोण ता.कळंब यांनी दि. १३/०४/२०२६ रोजी आपल्या अभिप्रायासह व आवश्यक कागदपत्रांसह अहवाल सादर केला आहे.

वरील जन्म बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप या कार्यालयास सादर करावा, आक्षेप मुदतीनंतरच्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**स्वाक्षरित/-**
**कार्यकारी दंडाधिकारी,कळंब**

---

**कार्यालय नगरपंचायत घनसावंगी जि.जालना**
**प्रशासकिय इमारत, घनसावंगी**
**जा.क्र.२०२६/नपप/जा.प्र./कावी-७५२**
**दि.१८/०८/२०२६**

## जाहिर प्रगटन

सर्व जनतेस या जाहीर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार रखमाजी विष्णू जाधव रा.ता.अंबड जि.जालना यांनी नामे रहेमानखाँ चाँदखा पठाण रा.ता.अंबड जि.जालना यांच्याकडून रजिस्टर दस्त क्रं.२६६१ दि.०२/११/२०१३ या खरेदीदस्तांची सत्य प्रत जोडुन आवक क्रं. (८९५) दि.१०/०८/२०२६ रोजी नोंद करण्यासाठी अर्ज सादर केला आहे.तेव्हा रहेमानखाँ चाँदखा पठाण रा.ता.अंबड जि.जालना यांच्या नावावर असलेला गट नं. (२४९) सिटी सर्व्हे नं.-मधील प्लॉट नं.४१ मधील क्षेत्र १४३.७५ चौ.मी.जागा ज्याची चतु:सिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्व :- २०फुट अंतर्गत रस्ता
पश्चिम. :- प्लॉट नं.-४६
दक्षिण :- प्लॉट नं.-४२
उत्तर :- प्लॉट नं.-४०

या वरील चतु:सिमा मधील प्लॉटचे १४३.७५ चौ.मी.जागाखरेदीदस्ता आधारे नोंद करणे बाबत कोणाचेही काही उजर/आक्षेप/तक्रार/असल्यास सदर जाहिर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून या कार्यालयात १५ दिवसाच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्या सह आक्षेप अर्ज दाखल करावा.नसता नियमाने मुदत संपल्यावर नोंद साठी कोणाचेही काहीही म्हणने नाही असे समजून नोंद कार्यवाही पूर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी

करिता जाहीर प्रकटन माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्याने दिले आहे.

**मुख्याधिकारी**
**नगरपंचायत घनसावंगी**

---

# दीनदयाळ बँकेची ३० वी वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

दीनदयाळ नागरी सहकारी बँक म.अंबाजोगाई बँकेची ३० वी वार्षिक सर्वसाधारण सभा कृषी विज्ञान केंद्र, डिघोळअंबा येथे नुकतीच रविवार, दिनांक १६ ऑगस्ट २०२६ रोजी खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली.

सभेच्या सुरूवातीला दीनदयाळ नागरी सहकारी बँकेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व सन्माननीय संचालकांनी भारतमाता आणि पंडित दीनदयाळजी यांच्या प्रतिमांचे पुजन केले. बँकेच्या संचालिका सौ.शरयूताई हेबाळकर यांनी सादर केलेल्या प्रार्थनेने सभेची सुरूवात झाली. सभेस उपस्थित अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि सन्माननीय संचालक व सभेस उपस्थित सन्माननीय सभासदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेश शेळके यांनी शब्द सुमनांनी स्वागत केले. सभेच्या सुरूवातीस 'सायबर सेक्युरीटी' बाबत संगणक विभागाचे प्रमुख मंगेश गोस्वामी यांनी मौलिक माहिती दिली. त्यानंतर प्रमोद रेणापूरकर, (कृषी विज्ञान शास्त्रज्ञ, कृषी विज्ञान केंद्र, डिघोळअंबा) यांनी शेती विषयक सखोल मार्गदर्शन केले. सभेची सुरूवात करण्यापूर्वी अहवाल वर्षात जे थोर नेते, संशोधक, शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ, लेखक, साहित्यिक, कलावंत, शिक्षणतज्ज्ञ, भारतमातेचे रक्षण करताना शहिद झालेले सैनिक, सामाजिक कार्यकर्ते, बँकेचे अधिकारी कै.सुदर्शन प्रल्हादराव टाक, बँकेचे कर्मचारी कै.पांडुरंग रामचंद्र सावरे यांच्यासह बँकेचे आजी, माजी सभासद, खातेदार, हितचिंतक, ज्ञात व अज्ञात अशा ज्या व्यक्तींचे निधन झाले, तसेच बँकेचे कर्मचारी यांच्या कुटुंबातील निधन झालेले व्यक्ती या सर्वांच्या दुःखात दीनदयाळ बँक परीवार सहभागी आहे. अशा सर्वांना नम्रतापूर्वक श्रध्दांजली अर्पण करण्यात आली व शांती मंत्राचे पठण संचालिका सौ.शरयुताई हेबाळकर यांनी केले. बँकेचे अध्यक्ष ऍड.मकरंद पत्की यांनी ३० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे अध्यक्षस्थान भूषवावे असे उपस्थित सभासदांपैकी केशव पाटलोबा मुंडे यांनी सुचविले तर त्याला श्रीपाद श्रीधर खारकर यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सभेच्या नोटीसचे वाचन करण्यात आले. बँक अध्यक्षांच्या अनुमतीने सभेस सुरूवात करण्यात आली. सभेत दिलेल्या विषयांवर चर्चा करण्यात आली. सर्व सन्माननीय संचालक यांनी सभेत सर्व विषय मांडले. बँकेच्या अध्यक्षांनी सन २०२५-२६ सालासाठी ४ टक्के एवढ्या लाभांश वाटपाची घोषणा केली. सभेत सभासदांकडून ऐनवेळी उपस्थित करण्यात आलेल्या विविध प्रश्नांना बँकेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व संचालक यांनी सकारात्मक उत्तरे दिली. क्रमशः विषय सभेत सादर करण्यापूर्वी दिनांक ३१ मार्च २०२६ वरील बँकेच्या आर्थिक स्थितीचा थोडक्यात अहवाल प्रस्तुत करताना बँकेचे भाग भांडवल - रू.१८.१८ कोटी, एकूण ठेवी - रू.६०९.८५ कोटी, दिलेली कर्जे - रू.३४६.६६ कोटी, गुंतवणुक - रू.२६१.९३ कोटी व करपूर्व नफा - रू.३.६२ कोटी असून सर्वच आर्थिक आर्थिक मापदंडात मागील वर्षीच्या तुलनेत वाढ झालेली असल्याचे सांगण्यात आले. तसेच विशेषत्वाने नमूद करावयाची बाब म्हणजे बँकेचा नक्त एनपीए ०.८७ टक्के व भारतीय रिझर्व बँकेच्या ई.सी.बी.ए. निकषाची बँकेने १०० टक्के पूर्तता केलेली असल्याचीही माहिती सभेत प्रस्तुत करण्यात आले. सभेच्या विषय पत्रिकेतील अनुक्रमांक १ ते १७ विषय सभेत मंजुरीस्तव प्रस्तुत करण्यात आले. सर्व विषयांवर सभासदांनी सविस्तर चर्चा केली. विषयाच्या अनुषंगाने सभासदांनी उपस्थित केलेल्या सर्व विषयांची सखोल माहिती सभेत देण्यात आली व चर्चेअंती सर्व विषय सर्वानुमते मंजूर करण्यात आले.



ऐनवेळेच्या विषयावर सभासदांनी उपस्थित केलेल्या सूचनांची नोंद घेण्यात आली. सभेचे सुत्रसंचालन मुख्य कार्यकारी अधिकारी महेश शेळके यांनी केले. तर सभेसाठी उपस्थित असलेल्या सर्वांचे आभार उपाध्यक्ष ऍड.राजेश्वर देशमुख यांनी मानले. सभा समाप्तीची अध्यक्षीय घोषणा व सभा समाप्तीनंतर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी उपस्थितांना भोजनाचा आस्वाद घेण्यात यावा बाबतची सुचना केली. सभा खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. शांती मंत्राने सभेची सांगता झाली. सभेस मोठ्या प्रमाणात सभासदांची उपस्थिती होती. तसेच मुख्यालयाचे अधिकारी, कर्मचारी व सेवक वर्ग उपस्थित होता.

---




**मुखेड ।प्रतिनिधी**

**राष्ट्रीय अल्पसंख्याक परिषदेच्या नांदेड जिल्हा सरचिटणीसपदी सामाजिक कार्यकर्ते हसनोद्दीन शेख उर्फ बबलू मुल्ला यांची निवड झाली. राष्ट्रीय अध्यक्ष राहुल डंबाळे यांच्या मान्यतेने, मराठवाडा अध्यक्ष आब्दुल माजीद बशीर यांच्या सूचनेनुसार जिल्हाध्यक्ष महेताब शेख यांनी त्यांना नियुक्तीपत्र देऊन सत्कार केला.या निवडीबद्दल शौकत पठाण सावरगावकर, मनोद्दीन शेख, हारून होनवडजकर, शेख जब्बार चांडोळकर, ॲड. गोविंद डुमणे, दिनेश पाटील केरूळकर, शौकत होनवडजकर, आमेर मोहम्मद शेख, सरपंच प्र. मुजाहीद मुजावर, उपसरपंच एजाज मुजावर, नाझीम पाशा सौदागर, ॲड. रहीम खान, ॲड. तांबोळी, ॲड. शफी सय्यद, ॲड. यादव कांबळे, ॲड. मिलिंद कांबळे, खाजा धुंदी, फेरोज मुजावर, गौस मणियार, मुजीब सय्यद, बबलू पठाण, इरशाद चोंडीकर, इरफान शेख डोरनाळीकर, इलियास कादरी, इसाक सलगरकर यांच्यासह सामाजिक कार्यकर्ते व नागरिकांनी अभिनंदन केले.**

---

**जाहीर प्रगटन पेपर**
**मा. के. सी. माने ३रे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात, बीड, ता.जि. बीड**
**किरकोळ दिवाणी अर्ज कमांक १३०३/२०२६**
**सीएनआर क्रमांक एमएचबीआय ०२०००० २३११२०२६**
**सुमन भ्र. प्रभू टेकडे व ईतर वि. निरंक**
**(मार्फत ॲड. वाय. एस. टेकाडे)**
**अर्जदार :-**
**१. सुमन भ्र. प्रभू टेकडे, वय ७२ वर्षे, धंदा-घरकाम, रा. अंधापुरी ता. जि. बीड**
**२. प्रभू पि. नागुजी टेकडे, वय-८० वर्षे, धंदा-शेती, रा. अंधापुरी ता. जि. बीड**
**विरुध्द**
**निरंक**
**मागणी अर्ज :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार मयताचे वारस म्हणुन मिळणे बाबत.**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत दत्ता प्रभू टेकडे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी मयत दत्ता प्रभू टेकडे यांचा मृत्यु दिनांक २६/१२/२०२३ रोजी झालेला आहे. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात वरील मयताचे वारस असल्या बाबत वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्ज दाखल केला आहे. अर्जदार क. १ ही मयताची आई असून अर्जदार क. २ हे मयताचे वडील आहेत. वरील अर्जदार शिवाय मयताचे इतर कोणीही कायदेशिर वारस नाहीत.

मयत दत्ता प्रभू टेकडे यांचे मृत्युनंतर वरील अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय कामाकरीत व ईतर कार्यालयीन उपयोगा करीता सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे सदरहू मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन तीस दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवुन आपली हरकत कळवावी. जर मुदतीत कोणीही हरकत न कळविल्यास हे न्यायालय अर्जदारांचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वानी नोंद घ्यावी.

प्रकरणातील पुढील तारीख १९/०९/२०२६

आज दिनांक ११ माहे ऑगस्ट २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**स्वाक्षरित/-**
**क. लिपीक.**

**आदेशावरुन,**
**स्वाक्षरित/-**
**अधिक्षक**
**सह दिवाणी न्यायालय, व. स्तर, बीड**

---

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**श्री . रविंद्र अ. मिसाळ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, गेवराई जि. बीड यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ६३१/२०२६**
**मैताब हयातरखा उर्फ हयातखाँ पठाण व इतर विरुद्ध निरंक**
**(मार्फत - ॲड. आर. एम. खरात)**

ज्याअर्थी मयत नामे जैतुनबी हयातखा पठाण, रा. चकलांबा ता. गेवराई जि.बीड हे/हया दिनांक १८/०३/२०१३ रोजी चकलांबा ता. गेवराई जि.बीड येथे मयत झाले / झाल्या आहेत, अर्जदार क्र. १ मैताब हयातखा ऊर्फ हयातखॉ पठाण, वय ८५ वर्षे, धंदा शेती, रा. चकलांबा ता. गेवराई जि.बीड, अर्जदार क्र. २ सिकंदर हयातखॉ पठाण, वय ७५ वर्षे, धंदा शेती, रा. चकलांबा ता. गेवराई जि.बीड यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हते असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदाराच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत जैतुनबी हयातखा पठाण यांचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक १७/०८/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले.

पुढील तारीख - ०९/१०/२०२६

**स्वाक्षरित/-**
**क.लिपीक**

**शिक्का**

**आदेशावरून**
**स.अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय**
**क.स्तर,गेवराई**

---

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई, जि. बीड येथील २ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री. एच. एम. मोमीन यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ६०९/२०२६**
**शेख कासम शेखलाल व इतर वि. निरंक**
**मार्फत - ॲड वाय, एच. पाटील, गेवराई**

अर्जदार
१. शेख कासिम शेखलाल
वय ८० वर्षे, धंदा - शेती
रा. चकलांबा ता. गेवराई जि. बीड
२. अतिकुर रहमान कासिम शेख
वय ५६ वर्षे, धंदा - शेती
रा. मासुम कॉलनी, बीड ता. जि. बीड
३. मुजिबुर रहेमान कासम शेख
वय ५१ वर्षे, धंदा - शेती
रा. मासुम कॉलनी, बीड ता. जि. बीड
४. अझीझ कसम शेख
वय ४९ वर्षे, धंदा - शेती
रा. चकलांबा ता. गेवराई जि. बीड
५. फजल रहेमान कासम शेख
वय ४२ वर्षे, धंदा - शेती
रा. चकलांबा ता. गेवराई जि. बीड
६. रईसा अन्वर सय्यद
वय ४७ वर्षे, धंदा - शेती
रा. घनसावंगी ता. घनसावंगी जि. जालना
७. रिझवाना बेगम आझम शेख
वय ४० वर्षे, धंदा - शेती
रा. धोंडराई ता. गेवराई जि. बीड
८. शाईन महेफुज रहेमान शेख
वय ५१ वर्षे, धंदा - शेती
रा. हजरत शहेन्शावली दर्गा, बीड ता. जि. बीड
९. अताउर रहमान महेफुज शेख
वय २८ वर्षे, धंदा - शेती
रा. चकलांबा ता. गेवराई जि. बीड
१०. शेख यास्मिन झाकेर बेग
वय २३ वर्षे, धंदा - शेती
रा. गांधी नगर, बीड ता. जि. बीड
११. फरहीन मुजाहिद शेख
वय ३१ वर्षे, धंदा - शेती
रा. ईस्लामपुरा, गेवराई ता. गेवराई जि. बीड
१२. शिरीन मोहसीन शेख
वय ३३ वर्षे, धंदा - शेती
रा. जामखेड ता. जामखेड जि. अ. नगर

ज्या अर्थी मयत नामे रफीयाबी कासम शेख हे अनुक्रमे दि.२८/०६/२०२५ रोजी मौजे चकलांबा ता. गेवराई जि. बीड येथे मयत झाले/झाल्या आहेत. अर्जदार यांनी शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे रफीयाबी कासम शेख रा. चकलांबा ता. गेवराई जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ११/०८/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीखः- २३/०९/२०२६

**स्वाक्षरित/-**
**क.लिपीक**

**शिक्का**

**आदेशावरून**
**स.अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय**
**क.स्तर,गेवराई**

---




# अवैध तलवारी बाळगणारे दोघे जेरबंद अडीच

## हजारांचा मुद्देमाल जप्त

जालना शेख फारुक :- जालना जिल्ह्यात अवैध शस्त्र बाळगणाऱ्यांविरुद्ध स्थानिक गुन्हे शाखेने धडक मोहीम सुरू केली असून, सोमवारी दि.१८ दोन तरुणांकडून दोन तलवारी जप्त करण्यात आल्या. या कारवाईत एकूण २ हजार ५०० रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून दोन्ही आरोपींना पुढील कारवाईसाठी सदर बाजार पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधु यांनी जिल्ह्यात अवैध शस्त्र बाळगणाऱ्या व्यक्तींचा शोध घेऊन कठोर कारवाई करण्याच्या सूचना स्थानिक गुन्हे शाखेला दिल्या होत्या. त्यानुसार पोलीस निरीक्षक पंकज जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने कारवाई सुरू केली होती.

दरम्यान १८ ऑगस्ट रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला रोहित दिनेश राजपुत वय १९ रा. ओम शांती गल्ली संभाजी नगर जालना याच्याकडे अवैध तलवार असल्याची माहिती मिळाली. पथकाने त्याचा शोध घेतला असता तो राहत्या घरी आढळून आला. त्याला ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याच्याकडून १ हजार ५०० रुपये किमतीची एक तलवार जप्त करण्यात आली.

रोहितची अधिक चौकशी केली असता त्याचा मित्र आदित्य सुरेश सोळंके वय २० रा.तीन मंदिर गल्ली संभाजी नगर जालना याच्याकडेही तलवार असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर पोलिसांनी आदित्यचा शोध घेतला असता तो स्वामी समर्थ वेल्डिंग दुकान सागर गल्ली भोकरदन नाका येथे आढळून आला. चौकशीदरम्यान त्याने दुकानातून तलवार काढून दिली. पोलिसांनी १ हजार रुपये किमतीची ती तलवार जप्त केली.दोन्ही आरोपींविरुद्ध पुढील कायदेशीर कारवाईसाठी त्यांना सदर बाजार पोलीस ठाणे जालना येथे हजर करण्यात आले आहे.

अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई

ही कारवाई पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधु, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी जालना अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव, सहायक पोलीस निरीक्षक सचिन खामगल, पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र वाघ तसेच पोलीस अंमलदार गोपाल गोशिक, लक्ष्मीकांत आडेप, शिवप्रसाद एंखडे, बाबासाहेब गायकवाड, कैलास चेके, योगेश सहाने, सागर बाविस्कर व दत्ता वाघूंडे यांनी केली.

---



**लोकशाहीर अण्णाभाऊ साठे स्मारकासाठी जागा द्या**

**माजलगाव ।प्रतिनिधी**

**माजलगाव येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या स्मारकासाठी जागा व निधी उपलब्ध करून देण्याच्या मागणीचे निवेदन उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडे देताना ब्रह्मगावचे उपसरपंच तथा मातंग समाजाचे युवा नेते अनिल राधे कांबळे. यावेळी मनोज वाघमारे, ईश्वर येवले, राम घोडके, विकास शेरकर, पप्पू बाबर, आकाश कारके, श्याम कांबळे, विक्रांत कांबळे, संकेत कांबळे, प्रशांत कांबळे, युवराज कांबळे, प्रवीण कांबळे, शरद कांबळे, सागर कांबळे, अविनाश कांबळे, दत्ता कांबळे यांच्यासह समाजबांधव उपस्थित होते.**

# अंबड तालुक्यात उमेद अभियानात लाखोंच्या गैरव्यवहाराचा आरोप विभागीय आयुक्तांकडे तक्रार

घुंगर्डे हादगाव ।प्रतिनिधी

अंबड तालुक्यातील उमेद-महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाच्या विविध उपक्रमांमध्ये लाखो रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा गंभीर आरोप स्वाभिमानी शेतकरी संघटनेने केला आहे. जिल्हा अभियान व्यवस्थापक शैलेश चौधरी आणि तालुका अभियान व्यवस्थापक मंजित कदम यांनी पदाचा गैरवापर करून निधी वितरणात अनियमितता केल्याचा आरोप करत या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय व निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी अशी मागणी विभागीय आयुक्तांकडे करण्यात आली आहे.स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे तालुका उपाध्यक्ष मुकेश डुचे यांनी १७ ऑगस्ट रोजी विभागीय आयुक्त कार्यालयात याबाबत लेखी निवेदन दाखल केले.अंबड तालुक्यातील महिला ग्रामसंघ प्रभागसंघ उत्पादक गट व्यावसायिक गट तसेच विविध शासकीय योजनांच्या निधी वाटपात मोठ्या प्रमाणावर आर्थिक अनियमितता झाल्याचा दावा निवेदनातून करण्यात आला आहे.

साहित्य खरेदीच्या नावाखाली ३१ हजार ७०४ रुपये प्रत्यक्षात साहित्य केवळ १० हजारांचे निवेदनातील एका गंभीर आरोपानुसार एका महिला ग्रामसंघाकडून साहित्य खरेदीच्या नावाखाली ३१ हजार ७०४ रुपये जमा करण्यात आले.मात्र प्रत्यक्षात केवळ १० हजार रुपयांचे साहित्य देण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. उर्वरित रक्कम नेमकी कुठे खर्च झाली तिचा हिशोब काय आणि जबाबदार कोण याची सखोल चौकशी करण्याची मागणी संघटनेने केली आहे.

उत्पादक व व्यावसायिक गटांच्या मंजुरीत आर्थिक देवाणघेवाणीचा आरोप

उत्पादक गट व व्यावसायिक गटांना पीजी मंजुरी देताना आर्थिक देवाणघेवाण झाल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे. संबंधित गटांना प्राप्त निधीच्या वितरणात अनियमितता झाली असून या निधीमध्ये अधिकाऱ्यांचा कथित वाटा असल्याचा गंभीर संशय व्यक्त करण्यात आला आहे. या आरोपांची कागदपत्रे निधी वितरणाची नोंद मंजुरी प्रक्रिया आणि लाभार्थ्यांच्या खात्यांची तपासणी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

दोन वर्षांपासून काही प्रभाग संघांच्या सर्वसाधारण सभा नाहीत अंबड तालुक्यातील काही प्रभाग संघांमध्ये मागील दोन वर्षांपासून सर्वसाधारण सभा घेण्यात आलेल्या नसल्याचा आरोपही संघटनेने केला आहे. त्यामुळे संघांच्या आर्थिक व्यवहारांमध्ये पारदर्शकता कितपत आहे निधीचा विनियोग कोणत्या पद्धतीने करण्यात आला आणि सभासदांच्या मान्यतेशिवाय निर्णय घेण्यात आले का याची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.१५ दिवसांत वर्ग-१ अधिकाऱ्यामार्फत चौकशीची मागणी

या प्रकरणातील सर्व तक्रारींची जिल्हा परिषदेतील वर्ग-१ दर्जाच्या अधिकाऱ्यामार्फत पुढील १५ दिवसांत निष्पक्ष चौकशी करण्यात यावी अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.चौकशीत आरोप तथ्यात्मक आढळल्यास संबंधित जिल्हा व तालुका अभियान व्यवस्थापकांवर नियमानुसार कठोर कारवाई करावी अशी मागणी संघटनेने केली आहे.

दरम्यान तक्रारीची दखल घेऊन योग्य ती कारवाई न झाल्यास विभागीय आयुक्त कार्यालयासमोर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटनेने दिला आहे.

या आरोपांबाबत संबंधित अधिकाऱ्यांची बाजू आणि चौकशीअंती समोर येणारे तथ्य महत्त्वाचे ठरणार असून उमेद अभियानातील निधी व्यवहारांची पारदर्शकता आता प्रशासनाच्या कसोटीवर लागली आहे.

# मनसेचा बदनापूर तालुक्यात झंझावात संघटनात्मक बांधणीला वेग



बदनापूर संजय भुजाळ

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या बदनापूर तालुक्यातील संघटनात्मक बांधणीला वेग देण्यासाठी शनिवारी दि.१५ बदनापूर येथील हॉटेल निवांतमध्ये तालुकास्तरीय आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले.या बैठकीत आगामी काळातील पक्षाची संघटनात्मक वाटचाल गावागावांत शाखा विस्तार आणि कार्यकर्त्यांची भूमिका यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.मनसेचे नेते माजी आमदार तथा जालना जिल्हा संपर्क अध्यक्ष ड. जयप्रकाश बाविस्कर यांनी उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. बदनापूर तालुक्यात पक्षाची संघटनात्मक ताकद वाढविण्यासाठी गावपातळीवर कार्यकर्त्यांचे जाळे मजबूत करण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच पक्षाची भूमिका आणि मनसेचे विचार जनतेपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सक्रिय राहावे असे आवाहन केले.यावेळी मनसेचे जालना जिल्हाध्यक्ष गजानन गिते, बदनापूर तालुकाध्यक्ष विष्णू शिंदे,तालुका उपाध्यक्ष कैलास खेंडके,रवि मदन,शिवाजी पवार,बाबासाहेब सुडके, गणेश शिंदे,ज्ञानेश्वर कातुरे, कैलास नरोडे,अनिकेत जारे, शहराध्यक्ष श्याम गायके यांच्यासह तालुक्यातील पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बैठकीत आगामी काळात तालुक्यात मनसेच्या शाखा अधिक बळकट करणे नवीन कार्यकर्त्यांना पक्षाच्या प्रवाहात जोडणे तसेच जनसामान्यांच्या प्रश्नांवर आक्रमकपणे भूमिका मांडण्याबाबतही चर्चा झाली. या बैठकीमुळे बदनापूर तालुक्यात मनसेच्या संघटनात्मक हालचालींना वेग येण्याची चिन्हे दिसून येत असून आगामी राजकीय वाटचालीच्या दृष्टीने ही बैठक महत्त्वपूर्ण मानली जात आहे.

# अति उत्कृष्ट सेवेसाठी पोलीस हवालदार किरण अश्रुबा कणखर यांचा गौरव

## ९व्या आंतरराष्ट्रीय पत्रकार संमेलनात इंडियन जर्नलिस्ट असोसिएशनतर्फे सन्मानचिन्ह प्रदान

जालना शेख फारुक :- पोलीस सेवेत कर्तव्यनिष्ठा प्रामाणिकपणा आणि समर्पणाची परंपरा जपत उल्लेखनीय कामगिरी बजावणारे जालना शहर वाहतूक शाखेतील पोलीस हवालदार किरण अश्रुबा कणखर यांचा अति उत्कृष्ट सेवेसाठी सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. जालना येथे आयोजित ९व्या आंतरराष्ट्रीय पत्रकार संमेलन व पुरस्कार सोहळा-२०२६ मध्ये इंडियन जर्नलिस्ट असोसिएशनच्या वतीने मान्यवरांच्या हस्ते त्यांना हा सन्मान प्रदान करण्यात आला.जालना शहरातील वाहतूक व्यवस्था सुरळीत ठेवणे वाहतूक नियमांची प्रभावी अंमलबजावणी करणे नागरिकांना सहकार्य करणे तसेच कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी कणखर यांनी बजावलेल्या उल्लेखनीय भूमिकेची दखल घेत त्यांचा गौरव करण्यात आला. कर्तव्य बजावताना नागरिकांशी संयमाने संवाद साधणे आणि वाहतुकीच्या समस्यांवर तत्परतेने उपाययोजना करण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील राहणे या त्यांच्या कार्याचेही यावेळी कौतुक करण्यात आले.

पोलीस सेवेत शिस्त कर्तव्यनिष्ठा आणि जनसेवा या त्रिसूत्रीला प्राधान्य देत किरण कणखर यांनी आपली जबाबदारी प्रभावीपणे पार पाडली आहे. त्यांच्या सेवाभावी कार्याची दखल घेत १५ ऑगस्ट रोजी अति उत्कृष्ट सेवा पदक-२०२६ या मानाच्या पुरस्कारानेही त्यांना सन्मानित करण्यात आले. त्यामुळे त्यांच्या कार्याला आणखी एक मानाचा तुरा लाभला आहे.

सन्मान स्वीकारल्यानंतर किरण अश्रुबा कणखर यांनी हा क्षण आपल्या आयुष्यातील अभिमानाचा आणि अविस्मरणीय असल्याची भावना व्यक्त केली. हा सन्मान केवळ वैयक्तिक गौरव नसून जनतेचा विश्वास अधिक जबाबदारीने जपण्याची प्रेरणा देणारा आहे. या




पुरस्कारामुळे भविष्यातही अधिक प्रामाणिकपणे निष्ठेने आणि समर्पित भावनेने सेवा बजावण्याची प्रेरणा मिळाली असे त्यांनी सांगितले.

यावेळी त्यांनी इंडियन जर्नलिस्ट असोसिएशन जालना तसेच पुरस्कार सोहळ्यास उपस्थित मान्यवरांचे आभार मानले. आपल्या सेवेत मार्गदर्शन करणारे वरिष्ठ अधिकारी सहकारी कर्मचारी आणि कुटुंबीय यांच्या सहकार्यामुळेच जबाबदारी अधिक प्रभावीपणे पार पाडता आल्याचेही त्यांनी नमूद केले.

कणखर यांच्या या सन्मानामुळे पोलीस दलातील कर्तव्यनिष्ठ आणि प्रामाणिक सेवेला मिळालेली ही पावती असल्याची भावना व्यक्त होत असून त्यांच्या कार्याचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

# 'महा वॉकेथॉन-वॉक फॉर वॉटर'मधून जलसंधारणाचा संदेश घराघरात - जलसंधारण मंत्री संजय राठोड

मुंबई ।प्रतिनिधी

माजी मुख्यमंत्री दिवंगत सुधाकरराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त २१ ऑगस्ट रोजी राज्यभर जलसंधारण दिन साजरा करण्यात येणार आहे. यानिमित्त सर्व जिल्ह्यांमध्ये तीन किलोमीटरची 'महा वॉकेथॉन-वॉक फॉर वॉटर' आयोजित करण्यात आली असून नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी केले.

'सेव्ह सॉईल, सेव्ह वॉटर, सिक्युअर टूमॉरो' या संकल्पनेतून 'पाणी अडवा, पाणी जिरवा, जलयुक्त महाराष्ट्र घडवा' हा संदेश दिला जाणार आहे. वॉकेथॉननंतर सहभागी नागरिकांना मृद व जलसंधारणाची शपथ देण्यात येईल. लोकप्रतिनिधी, अधिकारी-कर्मचारी, विद्यार्थी, युवक, खेळाडू, डॉक्टर, कलाकार, उद्योजक, स्वयंसेवी संस्था, महिला व सर्वसामान्य नागरिकांनी सहभागी व्हावे, असे नियोजन करण्यात आले आहे.

महा वॉकेथॉनसाठी क्यूआर कोडद्वारे ऑनलाइन नोंदणीची सुविधा असून सहभागी नागरिकांना ई-प्रमाणपत्र मिळणार आहे. उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या पहिल्या तीन सहभागींना अनुक्रमे २५ हजार, १५ हजार व १० हजार रुपये आणि गौरवचिन्ह देण्यात येणार आहे. तसेच सात जणांना प्रत्येकी तीन हजार रुपयांचे विशेष पुरस्कार मिळतील.

दरम्यान, १५ ते ३० वयोगटातील युवकांसाठी 'रील फॉर सॉईल अँड वॉटर कन्झर्वेशन' ही राज्यस्तरीय रील स्पर्धा आयोजित करण्यात आली असून अंतिम मुदत १९ ऑगस्ट २०२६ आहे. प्रत्येक जिल्ह्यातील विजेत्यांना २५ हजार, १५ हजार व १० हजार रुपये तसेच 'युवा-जलदूत' म्हणून गौरविण्यात येणार आहे.






मस्साजोग ।प्रतिनिधी

केज तालुक्यातील मस्साजोग जिल्हा परिषद शाळेत ८० वा स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी शिवसेना शिंदे गटाच्या पदाधिकारी डॉ. प्रतिभा अशोक थोरात यांनी शाळेत येण्यासाठी दररोज एक ते दीड किलोमीटर पायपीट करणाऱ्या आठ विद्यार्थ्यांना सायकली भेट दिल्या. त्यांच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. कार्यक्रमास शाळेतील शिक्षकवृंद तसेच शिक्षणप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्रा. सुशिलाताई मोराळे यांचा 'समाजरत्न' पुरस्काराने गौरव



बीड ।प्रतिनिधी

ज्येष्ठ समाजसेविका प्रा. सुशिलाताई मोराळे यांच्या वाढदिवसानिमित्त मातृभूमी प्रतिष्ठानच्या वतीने त्यांच्या निवासस्थानी शाल, पुष्पगुच्छ व सन्मानपत्र देऊन शिक्षण व समाजरत्न पुरस्काराने गौरव करण्यात आला. यावेळी डॉ. संजय तांदळे, नितीन जायभाये, बाजीराव ढाकणे, प्रा. बबनराव आंधळे, लक्ष्मण चाटे, रवींद्र मुंडे, पत्रकार गणेश ढाकणे, किशोर देवा कुलकर्णी आदी उपस्थित होते.

बेघर निवारा केंद्रात वाढदिवसानिमित्त प्रा. सुशिलाताई मोराळे, अभिजीत वैद्य व राजू वंजारे यांचा मातृभूमी प्रतिष्ठानच्या वतीने शाल, पुष्पगुच्छ व सन्मानपत्र देऊन समाजरत्न पुरस्काराने गौरव करताना प्राचार्य डी.जी. तांदळे, डॉ. संजय तांदळे, नितीन जायभाये, बाजीराव ढाकणे, पत्रकार गणेश ढाकणे, किशोर देवा कुलकर्णी, लक्ष्मणराव चाटे, पाशाभाई पटेल, श्याम मार्कंडे, रवींद्र मुंडे व बेघर निवारा केंद्रातील ज्येष्ठ नागरिक.

# जलसंधारण दिन विशेष लेख

# सुजलाम सुफलाम भारतासाठी जलसंधारण!

बीड - पाणी अर्थात जल आणि आपल्या जगण्यासाठी अत्यावश्यक असणारा एक घटक म्हणून याला जीवन देखील आपण म्हणतो. प्रत्येकासाठी पाणी आवश्यक आहे. आपण सर्वच जगात विकसित संस्कृतीचा अभ्यास केल्यास आपणांस जाणवतं की, वनांमधून आणि टोळ्यांमधून जगणारा मानव प्राणी ज्यावेळी सामाजिक व्यवस्था उभारणीसह शेती व्यवसायाला लागला, त्यावेळी सर्वांचा अधिवास नद्या आणि पाण्यांचे साठे आणि पाण्यावरच अवलंबून आहे. मानवी जीवनात पाणी हे प्राण व्यवस्था आहे. तसेच विकासाचा भाग म्हणून आपण इतर क्षेत्रांकडे बघतो. त्यावेळी कृषी सह उद्योग व्यवसासाठी देखील पाण्याचे तितकेच महत्त्व राहिलेले आहे. औद्योगिक क्रांती झाल्यानंतर नव्या उद्योगांमध्ये पाण्याचा वापर अधिक वाढत गेला.

आज विचार करायचा तर पाण्याबाबत प्रथम आकडेवारी बघायला हवी. जगात असणाऱ्या समुद्रांमधील पाणीसाठा एकूण पाणीसाठ्याच्या ९७% इतका आहे आणि हे पाणी क्षार युक्त आहे. अर्थात पिण्यायोग्य पाणी नाही. जे ३ टक्के पाणी पिण्यायोग्य म्हणता येईल, अशा स्थितीत आहे. त्यातील ६८ ते ७० टक्के पाणी ग्लेशियर अर्थात हिमनग आणि हिमनद्यांच्या स्वरूपात आहे. तर त्यानंतर शिल्लक राहणाऱ्या शुद्ध जलापैकी ३० टक्के पाणी हे भूजल (जमिनीखालील स्तरात) आहे. उर्वरित पाणी पावसाद्वारे जमिनीवर येते आणि नद्या, सरोवरे आणि भूतलावर येते. यात पावसाने पडणारे पाणी नद्यांमध्ये आले तरी त्यावर प्रक्रिया केल्याशिवाय ते जल उपलब्ध होत नाही, ही परिस्थिती आहे.

पृथ्वीची एकूण लोकसंख्या विभिन्न खंडांमध्ये विस्तारलेले आहे. त्या प्रत्येक ठिकाणी पावसाचे प्रमाण वेगवेगळे आहे. अशा स्थिती सोबत पाण्याची वाढती मागणी आणि उपलब्ध पाणी यांचा समतोल बिघडत असल्याचे आपणास दिसते आणि त्यावर उपाय अर्थात पाणी साठवणे आणि त्याचा योग्य पद्धतीने वापर करणे हाच आहे.

आपला भारत देश त्यातही मौसमी हवामान प्रदेशात आहे, त्यामुळे देशात चार महिन्यात पडणाऱ्या पावसावर १२ महिन्यांचे नियोजन करावे लागते. आपला देश मुख्यत्वेकरून कृषी प्रधान देश आहे आणि हे शेतीचे काम पाण्यावर आधारित असे आहे. पडणारा पाऊस कुठे आणि किती पडेल, याचा अंदाज वर्तवण्याचे तंत्र अवगत झाले असले तरी आपण लहरी अशा निसर्गावर निर्भर आहोत. यामुळे देशात पडणाऱ्या प्रत्येक पाण्याच्या/पावसाच्या थेंबाला आपण वापरणे हा सर्वोत्तम मार्ग आहे.

पाणी अडवणे जमिनीत जिरवून त्याचे साठे निर्माण करणे, तलावांच्या माध्यमातून अधिकाधिक पाणी साठवणे आदी पद्धतीने आपण पाण्याचा अधिक सुयोग्य वापर करू शकतो.

शेतीला लागणाऱ्या पाण्याची व्यवस्था शेतीतच असायला हवी. काही दशकांपूर्वी यांत्रिक क्षमता नव्हती, त्यावेळी शेतीत विहीर खोदून त्यातील भूजलावर शेती आपल्या देशात होत होती. परंतु यांत्रिकीकरण झाले आणि आम्ही भूजल साठा गतिमान पद्धतीने उपसा करायला लागलो आणि भूजल पातळीत झपाट्याने घट होत गेली.

नद्यांचे पाणी अडवून धरणे बांधणे पाटांच्या मदतीने शेतीस सिंचन व्यवस्था तयार करण्याचे धोरण स्वीकारण्यात आले. मात्र ही प्रक्रिया वेळखाऊ आणि खर्चिक अशीच आहे. एका बाजूला आपण धरणं बांधत असतांना, दुसऱ्या बाजूने औद्योगिकीकरण आणि शहरीकरण यात देखील झपाट्याने वाढ झाली. या सर्वात पिण्याच्या पाण्यास प्राधान्य असल्याने आधी पेयजल नंतर उद्योग आणि मग कृषी सिंचन या क्रमाने वापर करण्याची वेळ आल्याने धरणं भरली तरी इतर सुविधांच्या आभावी पाण्याचे संकट वाढत आहे. यासाठी आता जलसंधारणाचे महत्त्व देखील तितकेच वाढलेले आहे.


जलसंधारण क्षेत्रात राज्यात मोठ्या प्रमाणात कामे सुरू आहेत. मात्र याला अधिक बळकटी देण्याची गरज आहे. जलसंधारण केवळ याचा पहिला भाग ठरतो. सोबतच अधिक महत्त्व आहे ते मृदसंधारण अर्थात माती टिकवून ठेवणं देखील तितकच महत्त्वाचं ठरतं. ज्यावेळी पावसाचे प्रमाण अधिक असतं, त्यावेळी सुपीक जमीन पाण्यासोबत वाहून जाते. अनेकदा अतिवृष्टीने पाण्यासोबत जमीन खरडून जाते. परिणामस्वरूप जमिनीचा पोत कमी होऊन उत्पादकता कमी होण्यास सुरुवात होते.

जल आणि मृदसंधारण एकत्रित विचार केल्यास आपणास डोंगर माथा ते जमीन असा पाणलोट विस्तार करण्यासोबत शेततळे, पाण्याचे भूगर्भात फेरभरण व्हावे यासाठी रेन वॉटर हार्वेस्टिंग आदी पर्याय आहे.

भविष्यात आपल्या येणाऱ्या पिढीला उत्तम पर्यावरण आणि पाणीपुरवठा सुरळीत राखायचा असेल तर आजच्या पिढीची मोठी जबाबदारी हा महत्त्वाचा संदेश घराघरात आणि मनामनात पोहोचला तरच याबाबतीत सकारात्मक काम होईल आणि तसे सकारात्मक परिणाम, बदल आगामी काळात आपणास दिसतील. मी समाजाचा एक घटक आहे आणि ही माझी जबाबदारी आहे, असे म्हणत प्रत्येक नागरिक यात सहभागी झाला तरच आगामी काळात चांगली स्थिती पुन्हा निर्माण होऊ शकते.

कधी काळी पाण्याचे दुर्भिक्ष्य असणाऱ्या मध्य प्रदेशातील देवास मधील रेनवॉटर हार्वेस्टिंगने जलसंधारणाचा वस्तुपाठ घालून दिलेला आहे तर दुसऱ्या बाजूला लातूर जिल्ह्यात इतर जिल्ह्यातून पाणी आणून पिण्याच्या पाण्याची समस्या सोडविण्याची दुर्दैवी वेळ आपण अनुभवलेली आहे. वंदे मातरम या राष्ट्रीय गीताचे हे १५० वे वर्ष आहे. यातील प्रथम ओळींमध्ये सुजलाम, सुफलाम! शब्दांचा वापर याच अर्थाने आहे. त्यामुळे आताच कामाला लागूया पडणारा प्रत्येक थेंब जिरावला तर भारत पुन्हा सुजलाम व्हायला वेळ लागणार नाही.

**प्रशांत दैठणकर**
**९८२३१९९४६६**



# स्मृती जपत गुणवंत विद्यार्थ्यांना प्रोत्साहन; सातपुते कुटुंबीयांचा स्तुत्य उपक्रम

अंबड ।प्रतिनिधी

स्मृतीशेष नाथाजी रंगनाथ सातपुते यांच्या स्मृती चिरंतन जपण्याबरोबरच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने सातपुते कुटुंबीयांनी सुरू केलेला उपक्रम कौतुकास्पद ठरत आहे. सिद्धेश्वर पिंपळगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील गुणवंत विद्यार्थ्यांना दरवर्षी रोख बक्षिसे देण्याचा उपक्रम यंदाही उत्साहात राबविण्यात आला.विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाची आवड निर्माण व्हावी सामान्यज्ञानाची कक्षा रुंदावावी स्पर्धात्मक वृत्ती विकसित व्हावी आणि भविष्यात विविध स्पर्धा परीक्षांना सामोरे जाण्याची तयारी निर्माण व्हावी या उद्देशाने दरवर्षी १ हजार ८०० रुपयांची बक्षिसे देण्यात येतात.ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला योग्य वेळी मिळणारे प्रोत्साहन त्यांच्या




भविष्यातील वाटचालीसाठी महत्त्वाचे ठरते.त्यामुळे या उपक्रमाचे विशेष महत्त्व आहे.

यंदा गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये प्रथम क्रमांक अजिंक्य सातपुते यांना १ हजार रुपये, द्वितीय क्रमांक हर्षदा डोंगरे यांना ५०० रुपये,तर तृतीय क्रमांक श्रद्धा सातपुते यांना ३०० रुपये अशी रोख बक्षिसे देण्यात आली.

गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव केल्याने त्यांच्या आत्मविश्वासाला बळ मिळण्याबरोबरच इतर विद्यार्थ्यांमध्येही चांगली कामगिरी करण्याची प्रेरणा निर्माण होते. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना केवळ बक्षीस मिळत नसून मेहनत सातत्य आणि गुणवत्तेचे महत्त्वही अधोरेखित होत आहे.

स्मृतीशेष नाथाजी रंगनाथ सातपुते यांच्या स्मृती जपताना शैक्षणिक क्षेत्रात योगदान देण्याची सातपुते कुटुंबीयांची भूमिका सामाजिक बांधिलकीचे आदर्श उदाहरण ठरत आहे. या उपक्रमाबद्दल सातपुते कुटुंबीयांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

या बक्षिसांमुळे विद्यार्थ्यांना अधिक जोमाने अभ्यास करण्याची सामान्यज्ञान आत्मसात करण्याची तसेच स्पर्धा परीक्षांची तयारी करण्याची प्रेरणा मिळेल असा विश्वास शाळेच्या वतीने व्यक्त करण्यात आला.

या प्रेरणादायी उपक्रमासाठी विशेष पुढाकार घेणारे डॉ. सचिन भगवान सातपुते व त्यांच्या कुटुंबीयांचे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सिद्धेश्वर पिंपळगाव यांच्या वतीने मनःपूर्वक अभिनंदन व आभार व्यक्त करण्यात आले.

स्मृती केवळ आठवणीत न ठेवता त्या स्मृतींना समाजोपयोगी कार्याची जोड देणे हाच खऱ्या अर्थाने स्मृती जपण्याचा मार्ग आहे. सातपुते कुटुंबीयांनी सुरू केलेला हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी प्रेरणादायी ठरणार आहे.

# १९ हजार २४ फूट उंचीवर सायकलिंग डॉ.जवाहर काबरा यांचा विक्रमी पराक्रम

## माजी नगराध्यक्ष भास्करराव अंबेकर यांनी केला सत्कार वयाच्या ६७ व्या वर्षी ३६५ किमीचा खडतर प्रवास

जालना शेख फारुक :- जेईएस महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ.जवाहर काबरा यांनी वयाच्या ६७ व्या वर्षी अत्यंत खडतर आणि साहसी सायकलिंग मोहिमेत सहभागी होत उल्लेखनीय कामगिरी केली. युथ हॉस्टेल्स असोसिएशन ऑफ इंडियाच्या वतीने आयोजित लेह-उमलिंगला पास सायकल एक्स्पिडिशनमध्ये सहभागी होत त्यांनी तब्बल १९ हजार २४ फूट उंचीवरील उमलिंगला पास सायकलवरून गाठण्याचा विक्रम केला. त्यांच्या या साहसी कामगिरीबद्दल माजी नगराध्यक्ष भास्करराव अंबेकर यांनी भेट घेऊन त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले.

डॉ. काबरा यांनी लेहपासून सुरू झालेला सुमारे ३६५ किलोमीटरचा दुर्गम आणि खडतर सायकल प्रवास यशस्वीपणे पूर्ण केला. या प्रवासात शारा, चुमाथांग, न्योमा, होले, चमूमले आदी विविध टप्पे पार करत त्यांनी उमलिंगला पास गाठला. अत्यंत कमी ऑक्सिजन, उंच डोंगररांगा आणि प्रतिकूल भौगोलिक



परिस्थितीचा सामना करत त्यांनी ही मोहीम पूर्ण केली.

डॉ. जवाहर काबरा हे विद्यार्थी दशेपासूनच उत्कृष्ट विद्यार्थी संघटक म्हणून परिचित आहेत. सामाजिक कार्यातही त्यांचा सक्रिय सहभाग राहिला असून त्यांनी रक्तदान करणाऱ्या मोठ्या गटाची उभारणी केली होती. जेईएस महाविद्यालयात विद्यार्थीप्रिय प्राध्यापक म्हणून त्यांनी आपली वेगळी ओळख निर्माण केली. पुढे याच महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणूनही त्यांनी उल्लेखनीय कार्य केले.

सेवानिवृत्तीनंतरही वयाची मर्यादा न मानता डॉ. काबरा यांनी साहसी सायकलिंगचा छंद जोपासत तरुणांनाही प्रेरणा देणारी कामगिरी केली आहे. वय हे केवळ आकडा आहे इच्छाशक्ती आणि जिद्द असेल तर कोणतेही आव्हान पेलता येते याचा आदर्श त्यांनी आपल्या कृतीतून निर्माण केला आहे.

या विक्रमी आणि साहसी कामगिरीबद्दल माजी नगराध्यक्ष भास्करराव अंबेकर यांनी डॉ. काबरा यांचे कौतुक करून त्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी माजी शहरप्रमुख बाला परदेशी, नगरसेवक दुर्गेश काठोटीवाले, संजय अग्रवाल, दिनेश अग्रवाल, भरत गादीया, विजय शेंदरकर, बबनराव काजळे, जीवन खंडागळे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# वाढोणा ग्रामपंचायत भ्रष्टाचार प्रकरणी प्रशासनाला जाग

## लेखी आश्वासनानंतर आमरण उपोषण मागे उद्या जलजीवन मिशनच्या कामांची चौकशी

## पाच दिवसांत ग्रामपंचायतीच्या कामांसाठी समिती

भोकरदन इसरारखान पठाण

वाढोणा ग्रामपंचायतीतील २०१७ ते २०२६ या कालावधीतील विविध विकासकामांमध्ये कथित गैरव्यवहार व भ्रष्टाचार झाल्याच्या आरोपांप्रकरणी जिल्हा परिषद जालना येथे सुरू असलेल्या आमरण उपोषणाची अखेर प्रशासनाच्या लेखी आश्वासनानंतर सांगता झाली. उपोषणाच्या चौथ्या दिवशी प्रशासनाने चौकशीची कार्यवाही करण्याचे लेखी आश्वासन दिल्यानंतर उपोषणकर्ते अंकुश अशोक गवळी व पृथ्वीराज युवराज गवळी यांनी उपोषण मागे घेतले.१४ ऑगस्टपासून सुरू असलेल्या या आंदोलनाची जिल्हा प्रशासनाने दखल घेतली. जालना जिल्ह्याचे खासदार कल्याणराव काळे आणि माजी मंत्री अर्जुन खोतकर यांनी उपोषणस्थळी भेट देऊन आंदोलनकर्त्यांशी चर्चा केली. त्यानंतर जिल्हा परिषद प्रशासनाकडून दोन स्वतंत्र पत्रांद्वारे चौकशीचे आश्वासन देण्यात आले.

जलजीवन मिशनच्या कामांची प्रत्यक्ष चौकशी

कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद जालना यांच्या पत्र क्र. ३१९ नुसार ग्रामीण पाणीपुरवठा विभाग जि.प. उपविभाग भोकरदनचे उपअभियंता प्रत्यक्ष स्थळी भेट देऊन जलजीवन मिशनअंतर्गत करण्यात आलेल्या पाणीपुरवठा योजनेच्या कामांतील कथित अनियमिततेची चौकशी करणार आहेत.

पाच दिवसांत चौकशी समिती

उपमुख्य कार्यकारी अधिकारी पंचायत विभाग, जि.प. जालना डॉ.श्रीकृष्ण वेणीकर यांच्या पत्र



क्र. जिपज/पंचा-२/कावि/२०२६/१२०९, दि. १७ ऑगस्ट २०२६ नुसार, वाढोणा ग्रामपंचायतीतील विविध विकासकामांची सखोल चौकशी करण्यासाठी पाच दिवसांत सक्षम समिती स्थापन करण्यात येणार आहे. समितीकडून चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर नियमानुसार पुढील कार्यवाही केली जाणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

खासदार काळेंचा संताप दोषींवर कारवाईचे आश्वासन

उपोषणकर्त्यांनी सादर केलेली कागदपत्रे, पुरावे तसेच आंदोलनस्थळी लावण्यात आलेले बॅनर यांची पाहणी केल्यानंतर खासदार कल्याणराव काळे यांनी नाराजी व्यक्त केली. ग्रामपंचायतीच्या निधीचा गैरवापर किंवा निकृष्ट दर्जाची कामे खपवून घेतली जाणार नाहीत. चौकशीत दोष आढळल्यास संबंधितांवर कठोर कारवाई झाली पाहिजे अशी भूमिका त्यांनी व्यक्त केली. माजी मंत्री अर्जुन खोतकर यांनीही आंदोलनकर्त्यांच्या पाठीशी असल्याचे सांगत चौकशीसाठी पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले.

उपोषणकर्त्यांची प्रकृती खालावली

दरम्यान उपोषणाच्या चौथ्या दिवशी प्रमुख उपोषणकर्ते अंकुश अशोक गवळी यांची प्रकृती अचानक खालावली. सहकारी पृथ्वीराज युवराज गवळी यांनी पोलिसांना माहिती देऊन त्यांना शासकीय रुग्णालयात दाखल केले. उपचार सुरू असतानाही आंदोलनाचा मुद्दा मार्गी लागेपर्यंत उपोषण सुरू ठेवण्याची भूमिका त्यांनी घेतली होती. वाढोणा ग्रामपंचायतीतील कथित भ्रष्टाचाराचा मुद्दा दैनिक समर्थ राजयोगने सातत्याने मांडला होता. वाढोणा ग्रामपंचायत भ्रष्टाचारप्रकरणी उपोषणाचा पाचवा दिवस या मथळ्याखाली प्रसिद्ध झालेल्या वृत्ताची जिल्हा प्रशासनासह राजकीय नेत्यांनी गांभीर्याने दखल घेतल्यानंतर चौकशीच्या हालचालींना वेग आल्याचे आंदोलनकर्त्यांनी सांगितले.

ग्रामस्थांचा मोठा पाठिंबा

या आंदोलनाला वाढोणा येथील शंकर अशोक गवळी, मधुम अशोक गवळी, मनोज अशोक गवळी, कार्तिक रामदास पवार, अक्षय रामदास जाधव, कीर्तना अंबाराम सोनुने, कपिला कोंडिबा पाडळे, लक्ष्मी पुंजाजी डंगळे, दिनकर रमकिशन सिरसाठे, कविता गणेश निकाळजे यांच्यासह शेकडो महिला व पुरुषांनी स्वाक्षरी करून पाठिंबा दिला.

चार दिवस आमरण उपोषण केल्यानंतर प्रशासनाने लेखी आश्वासन दिले आहे. आता दिलेल्या मुदतीत चौकशी पूर्ण करून दोषींवर कारवाई झाली पाहिजे. अन्यथा पुन्हा आंदोलन छेडावे लागेल असा इशारा उपोषणकर्ते अंकुश गवळी व पृथ्वीराज गवळी यांनी दिला.

आता प्रशासनाने दिलेल्या मुदतीत चौकशी पूर्ण करून अहवाल सादर केला जातो का आणि त्यानंतर दोषींवर नेमकी कोणती कारवाई होते याकडे वाढोणा ग्रामस्थांसह संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

## पुण्यात २०३२ मध्ये युसीआय रोड वर्ल्ड चॅम्पियनशिप

मुंबई ।प्रतिनिधी

पुण्याला युसीआय रोड वर्ल्ड चॅम्पियनशिप-२०३२ चे यजमानपद मिळणार असून, स्पर्धेसाठी समर्थनपत्र, आर्थिक हमी, पायाभूत सुविधा व आयोजनाला मंत्रिमंडळाने मान्यता दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली हा निर्णय झाला. स्पर्धेमुळे सुमारे ३३० कोटींची आर्थिक उलाढाल अपेक्षित असून १०० हून अधिक देशांतील खेळाडू व क्रीडारसिकांचा सहभाग राहणार आहे. आयोजनासाठी ९९ कोटी रुपयांचा निधी सीएसआर व व्यावसायिक महसुलातून उभारला जाणार आहे.

....................

## गौण खनिजांच्या रॉयल्टीचे अनावश्यक खटले कमी होणार

मुंबई ।प्रतिनिधी

गौण खनिजांच्या स्वामित्वधन वसुलीतील अनावश्यक खटले कमी करण्यासाठी महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन नियम २०१३ मध्ये सुधारणा करण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली निर्णय झाला. महाखनिज २.० प्रणालीद्वारे खाणक्षेत्र, साठवणूक व वाहतुकीची माहिती पारदर्शक होणार असून परराज्यातून येणाऱ्या खनिजासाठी बारकोडयुक्त वाहतूक पास बंधनकारक केला जाणार आहे.

.................

## पीडब्ल्यूडीमध्ये 'ट्रेड्स' प्रणाली, कंत्राटदारांना वेळेत देयके

मुंबई ।प्रतिनिधी

सार्वजनिक बांधकाम विभागातील सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योजक तसेच कंत्राटदारांच्या देयकांसाठी ट्रेड रिसीव्हेबल इलेक्ट्रॉनिक डिस्काउंटिंग सिस्टीम (टीआरईडीएस) वापरण्यास मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली निर्णय झाला. देय रक्कम १८० दिवसांत न दिल्यास विलंबाच्या कालावधीसाठी व्याज देण्याची तरतूद करण्यात आली आहे.

....................

# मंत्रिमंडळ निर्णय

## गडचिरोली क्रीडा संकुलासाठी ८०.१२ कोटींच्या अंदाजपत्रकाला मंजुरी

मुंबई ।प्रतिनिधी

गडचिरोली जिल्हा क्रीडा संकुलाच्या दुसऱ्या टप्प्यातील विविध सुविधांसाठी ८० कोटी १२ लाख रुपयांच्या अंदाजपत्रकाला मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली निर्णय झाला. यामध्ये ४०० मीटर सिंथेटिक ट्रॅक, फुटबॉल मैदान, वसतिगृह, प्रेक्षक गॅलरी, जलतरण तलाव, टेनिस, व्हॉलीबॉल व कबड्डी मैदान तसेच पार्किंगचा समावेश आहे.

................

## सोलापूरच्या जांबमुनी मोची समाजाला शैक्षणिक कामासाठी भूखंड

मुंबई ।प्रतिनिधी

सोलापूर उत्तर, सदर बाजार येथील श्री जांबमुनी मोची समाज सेवा मंडळाला शैक्षणिक कामासाठी २३४६ चौ.मी. जमीन प्रचलित बाजारमूल्याच्या २० टक्के रकमेवर देण्यास मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली निर्णय झाला.

...................

## मोशीतील १५ हेक्टर जमीन चापेकर समितीला

मुंबई ।प्रतिनिधी

पुणे जिल्ह्यातील मोशी येथील १५ हेक्टर शासकीय जमीन चिंचवडच्या क्रांतीवीर चापेकर समिती संचालित क्रांतितीर्थ चापेकर बंधू राष्ट्रीय संग्रहालय व पुनरुत्थान समरसता गुरुकुलम अनुदानित आदिवासी आश्रमशाळेला देण्यास मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली निर्णय झाला. येथे मागास वंचित आदिवासी समाजासाठी सर्वांगीण विकास केंद्र उभारले जाणार आहे.



................

## धान-तांदूळ वाहतूक खर्चासाठी ३२८.४७ कोटी

मुंबई ।प्रतिनिधी

किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत २०२४-२५ मधील धान व तांदळाच्या वाहतूक खर्चासाठी ३२८ कोटी ४७ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय झाला. यापैकी सुमारे ८० कोटी केंद्राकडून, तर २४८ कोटी ४७ लाख रुपयांचा अतिरिक्त भार राज्य शासनावर राहणार आहे.

...................

## वित्त व नियोजन विभागांची पुनर्रचना

मुंबई ।प्रतिनिधी

वित्त व नियोजन विभागांची कार्यक्षमता वाढविण्यासाठी पुनर्रचनेला मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली निर्णय झाला. नियोजन विभागातील अर्थसंकल्पीय विषयांसह २८ पदे वित्त विभागाकडे हस्तांतरित करण्यात आली. नियोजन विभागाकडे आता योजना, कार्यक्रमांची फलनिष्पत्ती, मूल्यमापन, जिल्हा वार्षिक योजनांचा आढावा व विकास धोरणांच्या संनियंत्रणाची जबाबदारी राहणार आहे.



आडलूर तालुका मुखेड येथे स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.
(छाया मनोज बिरादार)




# हातात तलवार घेऊन दहशत पसरवणारा जेरबंद

अमरावती ।प्रतिनिधी

सातुर्णा रोडवरील डम्पिंग ग्राउंड परिसरात हातात लोखंडी तलवार घेऊन संशयास्पदरीत्या फिरणाऱ्या अभिषेक हेमराज सूर्यवंशी (वय २२, रा. न्यू सातुर्णा, बडनेरा रोड, अमरावती) याला शहर गुन्हे शाखेने अटक केली. त्याच्याकडून एक हजार रुपये किमतीची धारदार तलवार जप्त करण्यात आली. आरोपीने तलवारीचे छायाचित्र इन्स्टाग्रामवर पोस्ट केल्याचे तपासात समोर आले. त्याच्यावर शस्त्र कायद्यान्वये गुन्हा दाखल करून पुढील तपासासाठी राजापेठ पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले.

ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपआयुक्त शाम घुगे, सहाय्यक पोलीस आयुक्त प्रांजली सोनवणे व सहा. पोलीस आयुक्त संजय खताळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक दिनेश दहातोंडे यांच्या नेतृत्वाखाली सहा. पोलीस निरीक्षक मनीष वाकोडे, दशरथ आडे, फिरोज खान, संभाजी केंद्रे, मंगेश लोखंडे, नाझीमुद्दीन सय्यद, संजय भारसाकळे, सचिन भोयर, रंजीत गावंडे, नरेश मोहरील, सागर ठाकरे, सुरज चव्हाण, निखिल गेडाम, प्रभात पोकळे व चेतन शर्मा यांच्या पथकाने केली.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग अ‍ॅण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# आधुनिक तंत्रज्ञानासह स्वराज ८५५ एफई प्रोटेक सीरीज ट्रॅक्टर सावळेश्वर ट्रॅक्टर्समध्ये दाखल

## आ.सुरेश धस यांच्या हस्ते भव्य अनावरण





आष्टी - (एस.राजेंद्र लाड) शेतकऱ्यांच्या वाढत्या अपेक्षा आणि आधुनिक शेतीच्या बदलत्या गरजा लक्षात घेऊन स्वराज कंपनीने आधुनिक तंत्रज्ञानासह विकसित केलेला स्वराज ८५५ एफई प्रोटेक सीरीज ट्रॅक्टर आष्टी येथील सावळेश्वर ट्रॅक्टर्समध्ये दाखल झाला आहे. स्वातंत्र्यदिनाच्या शुभमुहूर्तावर १५ ऑगस्ट रोजी या नव्या ट्रॅक्टरचा भव्य अनावरण सोहळा आष्टी विधानसभा मतदारसंघाचे आ. सुरेश आण्णा धस यांच्या हस्ते शेकडो शेतकरी बांधवांच्या उपस्थितीत उत्साहात संपन्न झाला. आधुनिक सुविधा, दमदार कार्यक्षमता आणि शेतीतील विविध कामांसाठी उपयुक्त क्षमतेमुळे या नव्या ट्रॅक्टरच्या आगमनाबद्दल परिसरातील शेतकऱ्यांमध्ये मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे.आष्टी तालुक्यात ट्रॅक्टर उद्योगाच्या क्षेत्रात विश्वासार्ह नाव म्हणून सावळेश्वर ट्रॅक्टर्सने आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. शेतकऱ्यांना जलद, विश्वासार्ह आणि दर्जेदार सेवा देत सावळेश्वर उद्योग समूहाचे संस्थापक अध्यक्ष रमेश दादा आजबे यांनी हजारो शेतकरी बांधवांचा विश्वास संपादन केला आहे. त्यामुळे ट्रॅक्टर खरेदीसाठी परिसरातील शेतकऱ्यांची सावळेश्वर ट्रॅक्टर्सला मोठी पसंती मिळत आहे. स्वराज कंपनीचे अधिकृत वितरक असलेल्या सावळेश्वर ट्रॅक्टर्समध्ये स्वराज ८५५ एफई प्रोटेक सीरीज दाखल झाल्याने शेतकऱ्यांना अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा ट्रॅक्टर प्रत्यक्ष पाहण्याची व त्याची कार्यक्षमता जाणून घेण्याची संधी उपलब्ध झाली आहे.

स्वराज ८५५ एफई प्रोटेक हा पन्नास अश्वशक्ती क्षमतेचा दमदार ट्रॅक्टर असून, शेतीतील विविध कामे अधिक सुलभ व कार्यक्षम करण्यासाठी त्यामध्ये अनेक आधुनिक सुविधा देण्यात आल्या आहेत. या ट्रॅक्टरमध्ये ऑईल इमर्स्ड ब्रेक्स, पॉवर स्टिअरिंग, जीपीएस, पॉवर सेन्स लिफ्ट, ड्युरा-टफ क्सल, ड्युरा-मॅक्स क्लच, कम्फी-फ्लॅट डेक आणि डिजिटल क्लस्टर यांसारख्या सुविधा आहेत. या मॉडेलमध्ये दोन हजार पाचशे किलोग्रॅमपर्यंतची हायड्रॉलिक लिफ्ट क्षमता असून विविध पीटीओ पर्याय तसेच दोन चाकी आणि चार चाकी प्रकार उपलब्ध आहेत. त्यामुळे नांगरणी, पेरणी, मशागत, वाहतूक, अवजड शेती अवजारे चालविणे यासह ऊस वाहतूक आणि डोझर फळीच्या कामांसाठी हा ट्रॅक्टर उपयुक्त ठरणार आहे.आधुनिक तंत्रज्ञानामुळे शेतकऱ्यांच्या विविध गरजा लक्षात घेऊन या ट्रॅक्टरची रचना करण्यात आली असून, दमदार इंजिन क्षमता आणि विविध शेती अवजारांसोबत काम करण्याची क्षमता यामुळे शेतीतील अनेक कामे अधिक परिणामकारकपणे करता येणार आहेत. विशेषतः मोठ्या प्रमाणावर शेतीची कामे करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी तसेच अवजड शेती अवजारे वापरणाऱ्या शेतकऱ्यांसाठी हे मॉडेल उपयुक्त ठरणार असल्याचे सांगण्यात आले.सावळेश्वर ट्रॅक्टर्समध्ये स्वराज ८५५ एफई प्रोटेक सीरीज दाखल झाल्याने शेतकऱ्यांना या नव्या मॉडेलची माहिती, प्रत्यक्ष पाहणी आणि डेमोची सुविधा मिळणार आहे. ट्रॅक्टरच्या आधुनिक सुविधा, तांत्रिक वैशिष्ट्ये आणि विविध शेतीकामांमधील उपयोगिता समजून घेण्यासाठी इच्छुक शेतकऱ्यांनी सावळेश्वर ट्रॅक्टर्सशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. नवीन स्वराज ८५५ प्रोटेक सीरीजला शेतकऱ्यांकडून चांगला प्रतिसाद मिळत असून, आधुनिक शेतीच्या वाढत्या गरजा पूर्ण करण्यासाठी हे मॉडेल महत्त्वाचे ठरणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

या भव्य अनावरण सोहळ्यास आ. सुरेश आण्णा धस यांच्यासह परिसरातील शेतकरी, ग्राहक, सावळेश्वर ट्रॅक्टर्सचे पदाधिकारी, कर्मचारी आणि विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेतकऱ्यांच्या गरजा लक्षात घेऊन आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणारे ट्रॅक्टर उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने सावळेश्वर ट्रॅक्टर्सकडून करण्यात आलेल्या या उपक्रमाचे उपस्थित शेतकरी बांधवांनी स्वागत केले.

दरम्यान, स्वराज ८५५ एफई प्रोटेक सीरीज ट्रॅक्टरची बुकिंग सावळेश्वर ट्रॅक्टर्स येथे सुरू करण्यात आली आहे. आधुनिक तंत्रज्ञान, दमदार कार्यक्षमता आणि शेतीच्या विविध कामांसाठी उपयुक्त सुविधांनी सुसज्ज असलेल्या या ट्रॅक्टरचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या शेतकरी बांधवांनी सावळेश्वर ट्रॅक्टर्स, आष्टी येथे संपर्क साधून प्रत्यक्ष पाहणी व डेमो घेऊन बुकिंग करण्याचे आवाहन सावळेश्वर ट्रॅक्टर्सचे संस्थापक अध्यक्ष रमेश दादा आजबे यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी रमेश दादा आजबे, सावळेश्वर ट्रॅक्टर्स, आष्टी, मोबाईल क्रमांक ८०५५९९८०५५ यावर संपर्क साधता येणार आहे.



# एक वृक्ष भारतमाते च्या नावाने उपक्रमातून सौदाणा येथे वृक्षारोपण

केज/प्रतिनिधी


१५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून केज तालुक्यातील सौदाणा येथे सार्वजनिक शिव छत्रपती गणेश मंडळाच्या वतीने जिल्हा परिषद शाळेच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.एक वृक्ष भारत मातेच्या नावाने हा संदेश देत पर्यावरण संवर्धनाचा छोटासा, मात्र अर्थपूर्ण संकल्प यावेळी करण्यात आला.वृक्षारोपणानंतर मंडळाच्या वतीने दरवर्षी गावात वृक्षारोपण करून लावलेल्या झाडांचे योग्य संगोपन करण्याचा निर्धार करण्यात आला. केवळ वृक्ष लावणे नव्हे,तर त्यांची जपणूक करून ते मोठे करण्याची जबाबदारी ही स्वीकारण्याचा संदेश यावेळी देण्यात आला.ग्रोथ लाईक ट्री

ऋीेंह ङळज्ञश ढीशश या संदेशातून झाडा कडून जीवन जगण्याची प्रेरणा घेण्याचे आवाहन करण्यात आले.मुळं जमिनीत घट्ट रोवून परिस्थिती कितीही कठीण असली तरी सतत वाढत राहावे आणि मोठे झाल्यावर स्वतःपुरते न जगता इतरांना सावली द्यावी, हा विचार यावेळी मांडण्यात आला.

आज लावलेले हे छोटेसे रोप भविष्यात मोठे वृक्ष बनेल आणि त्याच्या सोबत गावातील पर्यावरण, विचार,संस्कार व सामाजिक बांधिलकी ही वाढत जावी,असा संकल्प सार्वजनिक शिवछत्रपती गणेश मंडळाच्या वतीने करण्यात आला.या उपक्रमातून एक संकल्प सुंदर भविष्या साठी हा संदेश ग्रामस्थांपर्यंत पोहोचविण्यात आला. यावेळी उपस्थित दिपक युवराज भिसे ग्रामपंचायत अधिकारी अंकुश इंगळे,उप सरपंच शिवराज काळदाते,जिल्हा परिषद शिक्षक नखाते सर,निपाणीकर सर,ग्रामपंचायत सदस्य किसन गालफाडे,सचिन काळदाते, माधव निकम,रशिद शेख,सुधिर चव्हाण, ओमकार भिसे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

# पाटोद्यात शिक्षणाचा नवा अध्याय ;नूतन इमारतीचे उद्घाटन अन् शैक्षणिक सहविचार सभा

## २२ ऑगस्टला आनंदराव धोंडे शैक्षणिक संकुलात आयोजन ;महाराष्ट्र भूषण भीमराव धोंडे यांच्या अध्यक्षतेखाली होणार कार्यक्रम



आष्टी - (एस.राजेंद्र लाड) पाटोदा येथील आनंदराव धोंडे शैक्षणिक संकुलात नूतन इमारतीचे उद्घाटन तसेच कर्मचारी शैक्षणिक सहविचार सभा-२०२६ चे आयोजन शनिवार, २२ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता करण्यात आले आहे. शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ, आष्टी, आनंद चॅरिटेबल संस्था, आष्टी, किसान शिक्षण संस्था, आष्टी आणि छत्रपती शाहू एज्युकेशन सोसायटी, आष्टी यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून, शिक्षण क्षेत्रातील बदलते प्रवाह, शैक्षणिक गुणवत्तावाढ, संस्थांची भविष्यातील वाटचाल आणि विविध शैक्षणिक विषयांवर या सहविचार सभेत मंथन होणार आहे. महाराष्ट्र भूषण तथा माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या कार्यक्रमाला पर्यावरण मंत्री पंकजा गोपीनाथ मुंडे यांच्यासह विविध राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ, आष्टी तसेच भगिनी संस्थांचे संस्थापक अध्यक्ष असलेले महाराष्ट्र भूषण भीमराव धोंडे यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेच्या माध्यमातून विविध शैक्षणिक उपक्रम राबविले जात आहेत. त्याच पार्श्वभूमीवर नूतन इमारतीचे उद्घाटन आणि कर्मचारी शैक्षणिक सहविचार सभा एकाच वेळी आयोजित करण्यात आली आहे. संस्थेतील कर्मचारी, पदाधिकारी, शैक्षणिक क्षेत्राशी संबंधित व्यक्ती तसेच निमंत्रित मान्यवर या सभेत सहभागी होणार असून, बदलत्या काळानुसार शिक्षण संस्थांनी कोणत्या पद्धतीने वाटचाल करावी, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेत वाढ करण्यासाठी कोणत्या उपाययोजना आवश्यक आहेत, आधुनिक शैक्षणिक पद्धतींचा प्रभावी वापर कसा करता येईल, यासह संस्थेच्या आगामी शैक्षणिक उपक्रमांवर चर्चा होणार आहे.

या कार्यक्रमास पर्यावरण मंत्री पंकजा गोपीनाथ मुंडे, माजी आमदार जयदत्त सोनाजीराव क्षीरसागर, माजी मंत्री पंडितराव नारायण दौंड, माजी आमदार सिराजोद्दीन सफदरअली देशमुख, माजी आमदार राधाकृष्ण साहेबराव पाटील, माजी आमदार संगीता विजयप्रकाश ठोंबरे, माजी आमदार नारायणराव मुंडे, माजी मंत्री शिवाजीराव अंकुशराव पंडित, आमदार धनंजय पंडितराव मुंडे, माजी मंत्री प्रा. सुरेश निवृत्ती नवले, माजी मंत्री अशोकराव शंकरराव पाटील, माजी आमदार राजेंद्र साहेबराव जगताप, माजी आमदार लक्ष्मण माधवराव पवार आणि माजी आमदार मोहनराव दिगंबराव सोळंके यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. तसेच दमयंती भीमराव धोंडे, महेश सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन डॉ. अजय धोंडे आणि अभय धोंडे यांचीही उपस्थिती राहणार आहे.

नूतन इमारतीचे उद्घाटन हा कार्यक्रमाचा महत्त्वाचा भाग असून, त्यानंतर कर्मचारी शैक्षणिक सहविचार सभेत शिक्षण क्षेत्रातील विविध विषयांवर विचारविनिमय होणार आहे. शिक्षण क्षेत्रातील नव्या संकल्पना, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक उपक्रम, शैक्षणिक गुणवत्तेचे सातत्याने मूल्यमापन आणि संस्थांच्या भविष्यातील नियोजनाच्या अनुषंगाने सभेत विविध सूचना व विचार मांडले जाणार आहेत. त्यामुळे ही सभा केवळ औपचारिक कार्यक्रम न राहता संस्थेच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी दिशादर्शक ठरण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

आनंदराव धोंडे शैक्षणिक संकुलात शनिवार, २२ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता होणाऱ्या या कार्यक्रमाकडे पाटोदा परिसरातील शिक्षण क्षेत्राचे लक्ष लागले असून, संस्थेच्या शैक्षणिक कार्याला आणि आगामी उपक्रमांना या सहविचार सभेतून नवी दिशा मिळण्याची अपेक्षा आहे.



# केज येथील बाबुरावजी आडसकर महाविद्यालयात पंडित दिन दयाल उपाध्याय प्लेसमेंट ड्राईव्ह संपन्न

केज/प्रतिनिधी

जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योगजकता मार्गदर्शन केंद्र,बीड यांच्याअंतर्गत पंडित दिनदयाळ उपाध्याय प्लेसमेंट ड्राईव्ह(मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना) व बाबुरावजी आडसकर महाविद्यालय केज यांच्या संयुक्त विद्यमाने रोजगार कौशल्य विकास मार्गदर्शन पर कार्यक्रम आयोजित करण्यात आला या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून श्री सुदाम मिसाळ (कनिष्ठ कौशल्य मार्गदर्शन अधिकारी) हे लाभले. त्याचबरोबर जयदत्त इंगोले रोजगार मेळावा अधिकारी पवन धाबेवार (समन्वयक) यांनी महाविद्यालया तील विद्यार्थ्यांना रोजगार व कौशल्य विकास या उपक्रमावर मार्गदर्शन केले.त्यांच्या कार्यालया अंतर्गत महाविद्यालयामध्ये कौशल्य विकास रोजगार योजनेतून मनोज आकुसकर, बालाजी डोंगरे,जाधव अजय,जाधव राहुल, निखिल पोटभरे, विश्वजीत देशमुख, प्रियंका इंगळे,साक्षी लाखे या आठ जणांना महाविद्यालयामध्ये ११ महिन्याच्या करारावर दहा हजार रुपये प्रति महा मानधनावर नियुक्ती देण्यात आल्या व त्यांचे नियुक्तीपत्र देऊन स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.किर्दंत सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.या प्रसंगी या शासनाच्या योजनेतून बेरोजगार विद्यार्थ्यांना प्रशासकीय काम करण्याची संधी मिळाली आहे असे सांगितले.या प्रसंगी वसंत कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य हेमंत देशमुख उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभागाचे विभाग प्रमुख डॉ. सोळंके सर यांनी केले. या प्रसंगी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील डॉ. बिडवे,डॉ.खुळे सर,डॉ. केदार,डॉ.गायके,डॉ. गालफाडे,डॉ.माने इत्यादी प्राध्यापक वर्ग व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्र संचालन व आभार प्रदर्शन मराठी विभागाचे डॉ.प्रशांत क्षीरसागर यांनी केले.

# महाश्वेता देवी यांचे साहित्य भारतीय स्वातंत्र्य, समतेच्या इतिहासातील प्रखर पर्व



अंबाजोगाई (प्रतिनिधी)

मराठवाडा साहित्य परिषद अंबाजोगाई यांच्या वतीने भारतीय साहित्यिक या मालिकेत प्रा.डॉ. शैलजा बरुरे, उपाध्यक्ष, मराठवाडा साहित्य परिषद शाखा अंबाजोगाई यांचे महाश्वेता देवी यांचे जीवन, सामाजिक कार्य व साहित्य यावर आधार मल्टीस्टेट, अंबाजोगाई येथे व्याख्यान संपन्न झाले.

प्रा.डॉ. शैलजा बरुरे यांनी आपल्या व्याख्यानात महाश्वेतादेवी यांच्या संपन्न व सामाजिक कार्याचा प्रदीर्घ कौटुंबिक वारसा वर्णन केला. साहित्यिक मनीष घटक व समाजसेविका धरित्री घटक यांची कन्या महाश्वेतादेवी यांनी शंभर पेक्षा अधिक कादंबरी लेखन व वीस कथासंग्रह प्रकाशित केले. महाश्वेतादेवी यांना आपल्या साहित्यिक योगदानाबद्दल भारतीय साहित्य अकादमी, पद्मश्री, पद्मविभूषण, ज्ञानपीठ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. झाशीची राणी, अरण्याचा अधिकार बिरसा मुंडा, हजार चुराशीरमा या साहित्यकृतीच्या माध्यमातून महाश्वेता देवी यांनी आदिवासी क्रांतिकारक बिरसा मुंडा व झाशीची राणी लक्ष्मीबाई यांनी भारतीय स्वातंत्र्यलढ्यासाठी ब्रिटिशांच्या विरुद्ध दिलेला लढा म्हणजे भारतीय इतिहासातील प्रखर पर्व असे म्हटले.

महाश्वेता देवी यांनी आदिवासींनी जल, जमीन व जंगल याबरोबरच मानवी हक्कांसाठी दिलेला लढा आपल्या साहित्याच्या केंद्रस्थानी ठेवला. आदिवासींचे जंगलातून विस्थापन, आर्थिक विषमता, आर्थिक शोषण, स्त्रियांचे दुय्यमत्व, सामाजिक रुढीग्रस्तता, अंधश्रद्धा यावर महाश्वेतादेवी यांनी आपल्या साहित्यातून मांडणी व चिकित्सा केली. समृद्ध आदिवासी संस्कृतीचा नागर संस्कृतीला परिचय करून दिला. रुदाली, हजार चुराशीरमा या चित्रपटांनी समाजाचे वंचित घटकाकडे लक्ष वेधले.

महाश्वेता देवी यांनी केवळ साहित्यातूनच आदिवासींचे संघर्ष उभे केले असे नाही तर प्रत्यक्ष जीवनातही विविध संस्था, संघटना यांची उभारणी करून आदिवासींवर होणाऱ्या अन्याय ,अत्याचाराचा प्रतिकार केल्याचे अनेक संदर्भ डॉ. शैलजा बरुरे यांनी दिले. प्राचीन काळापासून जागतिकीकरणापर्यंत सातत्याने आदिवासी शोषणास बळी पडत असल्याचे प्रतिबिंब महाश्वेतादेवी यांच्या साहित्यात अधोरेखित केल्याने अरण्याचा अधिकार ही चिरंतन घोषणा व पुढील काळात संघर्षाची दिशा निर्माण झाल्याचे सांगितले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठवाडा साहित्य परिषदेचे सचिव श्री.गोरख शेंद्रे यांनी केले. व्याख्यात्यांचा परिचय व आभार प्रदर्शन भारतीय साहित्य मालेचे संयोजक श्री. अनिरुद्ध चौसाळकर यांनी केले.

कवितासंग्रह विवेकधारा चे प्रकाशन

मराठवाडा साहित्य परिषद शाखा अंबाजोगाई च्या वतीने अंबाजोगाई शहरातील कवींच्या प्रतिनिधिक कविता संग्रह प्रकाशन समारंभ मराठवाडा साहित्य परिषद शाखा अंबाजोगाई चे अध्यक्ष डॉ.राहुल धाकडे यांच्या हस्ते व मार्गदर्शक, विवेकधारा या कवितासंग्रहाचे संपादक अमर हबीब यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रमाच्या सुरुवातीला संपन्न झाला. यावेळी कवितासंग्रहाचे संकलक राजेश रेवले, प्रस्तावनाकार तीलोत्तमा पतकराव, सचिव श्री. गोरख शेंद्रे, मुखपृष्ठ निर्माता विद्यार्थी आशिष काठोळे यांचा सन्मान करण्यात आला.

कवितासंग्रहाचे प्रकाशन व व्याख्यान या दोन्ही कार्यक्रमासाठी डॉ. दिलीप खेडगीकर, कवी श्री. गणपत व्यास गुरुजी, आशा वाघमारे,डॉ. सुलभा खेडगीकर, प्रा.अभिजीत लोहिया, श्री. माणिकराव बावणे, डॉ. शुभदा लोहिया, प्राध्यापक आर.डी. जोशी,प्रा. अरुंधती पाटील, सौ. कमलबाई बरुरे, श्रीमती भुसा मॅडम, श्री. महावीर भगरे, कल्पना लोहिया, सुजाता भोजने, अविष्कार जंगले यांची उपस्थिती होती.



# जनविकास महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य पदी प्रा.डॉ.मुरलीधर लहाडे यांची नियुक्ती

केज/प्रतिनिधी

केज तालुक्यातील बनसारोळा,येथील जनविकास महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य पदी प्रो.डॉ.मुरलीधर लहाडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बाबासाहेब गोरे साहेब हे सेवानिवृत्त झाले असल्याने रिक्त पदावर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. प्रो.डॉ.लहाडे मुरलीधर हे महाविद्यालयात हिंदी विभाग प्रमुख म्हणून २००३ पासून कार्यरत आहेत.अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष (खट-उ),छ--उ तसेच यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे केंद्र संयोजक म्हणून त्यांनी काम पाहिले आहे. त्यांची पाच पुस्तके हिंदी विषयातील प्रकाशित झाली आहेत.संशोधक मार्गदर्शक म्हणून त्यांचे तीन विद्यार्थी पीएच.डी अवार्ड झाले आहेत व तीन विद्यार्थ्यांचे सबमिशन झालेले आहे.विद्यापीठाच्या विविध कमिट्यावरही त्यांनी काम केले आहे.

त्यांच्या या निवडीबद्दल कृष्णाई शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव डॉ.बाबासाहेब गोरे,सहसचिव लताताई गोरे,अध्यक्षा राजामती तट,उपाध्यक्ष युवराज दादा गोरे सर्व संचालक मंडळ व महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक,कर्मचारी यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.



ज्येष्ठ पत्रकार प्रा.शेख निसार यांच्या कन्या सालेहा यांच्या शुभविवाह प्रसंगी वर शोएब यांना शुभेच्छा देतांना आष्टी तालुक्यातील पत्रकार बांधव.(छाया-एस.राजेंद्र लाड)

# जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भातोडी येथे स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

## चिमुकल्यांच्या लेझीम पथकाने वेधले ग्रामस्थांचे लक्ष

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) भातोडी, ता. आष्टी, जि. बीड येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत स्वातंत्र्य दिन अत्यंत उत्साहपूर्ण आणि देशभक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले ते शाळेतील चिमुकल्या विद्यार्थ्यांनी सादर केलेले आकर्षक व शिस्तबद्ध लेझीम पथक. विद्यार्थ्यांनी तालबद्ध पद्धतीने लेझीमचे सादरीकरण करत उपस्थित ग्रामस्थ, पालक व मान्यवरांचे लक्ष वेधून घेतले. विद्यार्थ्यांच्या उत्साहपूर्ण सादरीकरणाला उपस्थितांनी उत्स्फूर्त दाद देत त्यांचे कौतुक केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सिद्धेश्वर शिंदे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी शाळेतील विद्यार्थी, शिक्षक, पालक, ग्रामस्थ तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. ध्वजारोहणानंतर राष्ट्रगीत गायन करण्यात आले. स्वातंत्र्य दिनानिमित्त विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेम, राष्ट्रनिष्ठा आणि स्वातंत्र्याच्या मूल्यांची जाणीव निर्माण व्हावी, या उद्देशाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने कार्यक्रमात सहभाग घेतल्याने शाळेच्या परिसरात आनंदाचे व उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने ग्रामपंचायत कार्यालयाच्या वतीने शाळेतील विद्यार्थ्यांना स्पोर्ट ड्रेसचे वाटप करण्यात आले. एकसमान स्पोर्ट ड्रेस मिळाल्याने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून येत होता. शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांनी क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रातही पुढे जावे, त्यांच्या कलागुणांना वाव मिळावा आणि विद्यार्थ्यांमध्ये संघभावना व आत्मविश्वास निर्माण व्हावा, यासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व असल्याचे यावेळी उपस्थितांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच श्रीमती छबुबाई पांढरे होत्या. त्यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना भातोडी गावातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ही गावाच्या शैक्षणिक विकासासाठी महत्त्वाची संस्था असून शाळेची पटसंख्या वाढविण्यासाठी सर्व ग्रामस्थांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन केले. पालकांनी आपल्या पाल्यांना नियमितपणे शाळेत पाठवावे, शाळेतील शिक्षकांना सहकार्य करावे आणि शाळेच्या विविध उपक्रमांमध्ये सहभागी होऊन विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व सर्वांगीण विकासासाठी हातभार लावावा, असेही त्यांनी सांगितले.




गावातील शाळेचा विकास हा केवळ शिक्षक किंवा शाळेची जबाबदारी नसून त्यासाठी ग्रामस्थ, पालक, ग्रामपंचायत आणि शाळा व्यवस्थापन समितीने एकत्रितपणे प्रयत्न करणे गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमातील सर्वाधिक लक्षवेधी बाब म्हणजे विद्यार्थ्यांचे लेझीम पथक. चिमुकल्या विद्यार्थ्यांनी अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने आणि उत्साहाने लेझीम सादर करून कार्यक्रमाला विशेष रंगत आणली. विद्यार्थ्यांच्या तालबद्ध हालचाली आणि उत्साह पाहून उपस्थित ग्रामस्थांनी त्यांचे कौतुक केले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये असलेल्या कलागुणांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी शाळेच्या माध्यमातून विविध सांस्कृतिक व क्रीडा उपक्रम राबविणे आवश्यक असल्याचे यानिमित्ताने अधोरेखित झाले. विद्यार्थ्यांनी केलेल्या या सादरीकरणामुळे स्वातंत्र्य दिनाच्या कार्यक्रमाचा उत्साह आणखी वाढला.

या कार्यक्रमासाठी उपसरपंच प्रशांत शिंदे, माजी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष केशव गिते, शिक्षणप्रेमी नागरिक केदार गिते, सरकाळे सर, बंडू शिंदे, पोलिस पाटील सिता सरकाळे, संगीता गिते, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य राहुल धेवडे, जनाबाई सरोदे, माधुरी अनारसे, रेणुका गायकवाड, आशा सेविका राणी गिते, अंगणवाडी ताई चंद्रकला शिंदे, प्रतीक्षा शिंदे यांच्यासह अनेक मान्यवर, पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मान्यवरांच्या उपस्थितीमुळे विद्यार्थ्यांचा उत्साह वाढला. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यात आले तसेच शाळेच्या प्रगतीसाठी सर्वांनी सहकार्य करण्याची भावना व्यक्त केली. स्वातंत्र्य दिनाचा कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी अनिल धनवडे, सौरभ गिते आणि ओम शिंदे यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या आयोजनापासून ते विद्यार्थ्यांच्या विविध उपक्रमांच्या तयारीपर्यंत त्यांनी सहकार्य केले. शाळेतील शिक्षकांनीही विद्यार्थ्यांना आवश्यक मार्गदर्शन करून कार्यक्रमासाठी तयारी करून घेतली. त्यामुळे कार्यक्रम नियोजनबद्ध आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुख्याध्यापक गणेश निकम यांनी प्रभावीपणे केले. त्यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत करत कार्यक्रमातील विविध उपक्रमांची माहिती दिली. कार्यक्रमाच्या शेवटी सहशिक्षक तुषार पवार यांनी उपस्थित सर्व मान्यवर, ग्रामस्थ, पालक, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य, शिक्षक, विद्यार्थी तसेच कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सहकार्य करणाऱ्या सर्वांचे आभार मानले. भातोडी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत झालेल्या या स्वातंत्र्य दिनाच्या कार्यक्रमातून शाळा, ग्रामपंचायत, पालक, शाळा व्यवस्थापन समिती आणि ग्रामस्थ यांच्यातील समन्वयाचे सुंदर दर्शन घडले. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देतानाच त्यांच्यामध्ये देशप्रेम, शिस्त, संघभावना आणि सामाजिक बांधिलकीची भावना निर्माण करण्याचा प्रयत्न या कार्यक्रमातून करण्यात आला. विशेषतः चिमुकल्या विद्यार्थ्यांच्या लेझीम पथकाने सादर केलेल्या आकर्षक प्रात्यक्षिकामुळे उपस्थित ग्रामस्थ भारावून गेले. विद्यार्थ्यांचा उत्साह, ग्रामस्थांचा उत्स्फूर्त सहभाग, ग्रामपंचायतीकडून करण्यात आलेले स्पोर्ट ड्रेसचे वाटप आणि मान्यवरांचे मार्गदर्शन यामुळे भातोडी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील स्वातंत्र्य दिनाचा कार्यक्रम उत्साहात व संस्मरणीय वातावरणात संपन्न झाला.

# अंबाजोगाईसाठी आणखी ६६ घरकुलांना मंजुरी

नगराध्यक्ष नंदकिशोरजी मुंदडा (काकाजी) यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला मोठे यश

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

नवी दिल्ली येथे झालेल्या केंद्रीय मंजुरी आणि संनियंत्रण समितीच्या बैठकीत अंबाजोगाई शहरासाठी प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत आणखी ६६ घरकुलांना अधिकृत मंजुरी देण्यात आली आहे. गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्रालयाने यासंदर्भातील आदेश जारी केले आहेत. शहरातील सर्वसामान्यांना हक्काचे घर मिळावे यासाठी नगराध्यक्ष नंदकिशोर मुंदडा यांनी शासनाकडे केलेल्या सातत्यपूर्ण आणि प्रभावी पाठपुराव्यामुळे हे यश मिळाले असून, नागरिकांमधून मोठे समाधान व्यक्त केले जात आहे.

यापूर्वी शहराची धुरा हाती घेतल्यानंतर नंदकिशोर मुंदडा यांनी आपल्या कार्यकाळाच्या सुरुवातीलाच ७१ घरकुले मंजूर करून आणली होती. त्यानंतर आता नव्याने आणखी ६६ घरकुलांना मंजुरी मिळवून देण्यात त्यांना मोठे यश आले आहे. या दोन्ही टप्प्यांमुळे शहरातील अनेक गरीब आणि गरजू कुटुंबांचे स्वतःच्या हक्काच्या घराचे स्वप्न साकार होणार आहे. ६ ऑगस्ट २०२६ रोजी झालेल्या बैठकीत या प्रस्तावावर शिक्कामोर्तब करण्यात आले असून १७ ऑगस्ट २०२६ रोजी याचे अधिकृत कार्यालयीन ज्ञापन काढण्यात आले आहे. याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहनिर्माण मंत्री मनोहरलाल खट्टर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा गृहनिर्माण मंत्री




एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार, मंत्री पंकजाताई मुंडे, गृहनिर्माण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर आणि आमदार नमिता मुंदडा यांचे नगराध्यक्ष नंदकिशोर मुंदडा यांनी आभार मानले आहेत.

शहराच्या सर्वांगीण विकासासोबतच तळागाळातील नागरिकांचे जीवनमान उंचावण्यावर नंदकिशोर मुंदडा यांनी नेहमीच भर दिला आहे. केवळ पोकळ घोषणा न करता प्रत्यक्ष कृतीतून त्यांनी सर्वसामान्यांचे प्रश्न मार्गी लावले आहेत. घरकुल योजनेच्या प्रस्तावांपासून ते अंतिम मंजुरीपर्यंत प्रशासकीय पातळीवर त्यांनी जातीने लक्ष घालून पाठपुरावा केला. त्यांच्या या धडाडीच्या कार्यपद्धतीमुळे आणि गरिबांप्रती असलेल्या बांधिलकीमुळे अंबाजोगाईकरांना मोठा दिलासा मिळाला असून, सर्वत्र त्यांचे कौतुक होत आहे. याकामी त्यांना शासन पातळीवर आमदार नमिता मुंदडा यांचे मोठे सहकार्य लाभत आहे...

# महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेतूनच भविष्यातील उत्तम वक्ते घडतात-किशोर हंबर्डे

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) महाविद्यालयीन जीवन हे विद्यार्थ्यांच्या वैचारिक जडणघडणीचे महत्त्वपूर्ण पर्व असून, या काळात विद्यार्थ्यांच्या ज्ञानाला योग्य दिशा देतानाच त्यांच्यातील वक्तृत्व, अभिव्यक्ती आणि चिकित्सक विचारशक्तीला व्यासपीठ मिळणे गरजेचे आहे. महाविद्यालयीन स्तरावर आयोजित होणाऱ्या वक्तृत्व स्पर्धांमधूनच भविष्यातील अनेक उत्तम वक्ते घडतात, असे प्रतिपादन आष्टी तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष किशोर हंबर्डे यांनी केले.

आष्टी तालुका शिक्षण प्रसारक मंडळ संचलित ॲड. बी. डी. हंबर्डे महाविद्यालय, आष्टी येथे कै. ॲड. बन्सीधर (भाऊ) धोंडीबापू हंबर्डे यांच्या १२ व्या स्मृतिप्रीत्यर्थ राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेच्या अध्यक्षस्थानावरून मार्गदर्शन करताना किशोर हंबर्डे बोलत होते. विद्यार्थ्यांनी केवळ अभ्यासक्रमापुरते मर्यादित न राहता सामाजिक, राष्ट्रीय तसेच समकालीन प्रश्नांचा चिकित्सक अभ्यास करावा आणि त्यावर आपले विचार प्रभावीपणे मांडण्याची क्षमता विकसित करावी, असे आवाहनही त्यांनी केले. वक्तृत्व स्पर्धा ही विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाबरोबरच आत्मविश्वास, विचारक्षमता आणि अभिव्यक्ती कौशल्य वाढविण्यासाठी महत्त्वाचे माध्यम असल्याचे त्यांनी सांगितले.

यावर्षीच्या वक्तृत्व स्पर्धेसाठी 'पेपरफुटी आणि स्पर्धा परीक्षांची विश्वासार्हता', 'भेसळ : नैतिक मूल्यांचा ऱ्हास की नफेखोरीचे धोरण' आणि 'बदलत्या हवामानात भारतीय शेतीचे भवितव्य' हे तीन समकालीन आणि समाजजीवनाशी निगडित विषय ठेवण्यात आले होते. महाराष्ट्राच्या विविध भागांतून आलेल्या विद्यार्थ्यांनी या विषयांचा सखोल अभ्यास करून





अभ्यासपूर्ण, चिकित्सक आणि प्रभावी विचार मांडले. स्पर्धकांच्या मुद्देसूद मांडणीमुळे उपस्थितांना विविध सामाजिक प्रश्नांकडे नव्या दृष्टिकोनातून पाहण्याची संधी मिळाली.

या स्पर्धेला राज्यस्तरीय स्वरूप प्राप्त झाले असून पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, लातूर, कोल्हापूर, सांगली, सातारा, बीड आणि अहिल्यानगर यांसह विविध जिल्ह्यांतील महाविद्यालयांमधून विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. विविध विषयांवर स्पर्धकांनी केलेली वैचारिक मांडणी, प्रभावी वक्तृत्वशैली आणि चिकित्सक दृष्टिकोन यामुळे स्पर्धेला विशेष रंगत आली.

स्पर्धेत न्यू आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, पारनेर येथील आकाश मोहिते यांनी प्रथम क्रमांक पटकावला. ॲड. बी. डी. हंबर्डे महाविद्यालय, आष्टी येथील कु. गायत्री शिवराम वायकर यांनी द्वितीय क्रमांक मिळवून महाविद्यालयाचा गौरव वाढविला, तर प्रतिष्ठान महाविद्यालय, पैठण येथील कु. गौरी पुरुषोत्तम दहीभाते यांनी तृतीय क्रमांक मिळविला. बी. जे. एस. कॉलेज, पुणे येथील गोविंद तुकाराम भांड यांनी उत्तेजनार्थ प्रथम, तर न्यू आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, अहिल्यानगर येथील सुजित भाऊसाहेब पानसंबळ यांनी उत्तेजनार्थ द्वितीय क्रमांक मिळविला.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने 'ॲड. बी. डी. हंबर्डे समाजाभिमुख उत्कृष्ट प्राध्यापक राष्ट्रीय पुरस्कार-२०२६' हा मानाचा पुरस्कार शिक्षण महर्षी गुरुवर्य आर. जी. शिंदे महाविद्यालय, परांडा येथील वनस्पतीशास्त्र विभागाचे डॉ. सचिन सुभाषराव चव्हाण यांना प्रदान करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष किशोर हंबर्डे यांच्या हस्ते डॉ. सचिन चव्हाण यांचा सन्मान करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना डॉ. चव्हाण यांनी ॲड. बी. डी. हंबर्डे महाविद्यालयाच्या विविध समाजाभिमुख उपक्रमांचे कौतुक केले.

कार्यक्रमास आष्टी तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष दिलीप वर्धमाने, सचिव अतुल मेहेर, सहसचिव श्रीमती सुलभाताई हंबर्डे, संचालक श्रीमती रत्नमाला बन्सीधर हंबर्डे, सुभाण पठाण, महेश चवरे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. निंबोरे, प्राध्यापकवृंद, विद्यार्थी तसेच विविध महाविद्यालयांतून आलेले स्पर्धक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. भगवान वाघमारे यांनी केले. प्रा. शुभांगी खुडे यांनी प्रास्ताविक करून प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला, तर प्रा. अंबादास शिरावळे यांनी आभार मानले.

कै. ॲड. बन्सीधर (भाऊ) हंबर्डे यांच्या स्मृती जपत ज्ञान, विचार आणि अभिव्यक्तीची परंपरा पुढे नेणारा हा उपक्रम ठरला. विद्यार्थ्यांच्या वक्तृत्वकौशल्याला व्यासपीठ उपलब्ध करून देतानाच सामाजिक प्रश्नांवर चिकित्सक विचार करण्याची आणि आपली भूमिका प्रभावीपणे मांडण्याची संधी या स्पर्धेतून मिळाली. त्यामुळे राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी तसेच भविष्यातील प्रभावी वक्ते घडविण्यासाठी प्रेरणादायी ठरली.

# केज येथे हजरत ख्वाजा मोहजेबोद्दिन रहमतुल्ला अलैह यांचा उर्स मोठ्या उत्साहात संपन्न होणार

## हिंदू- मुस्लिम ऐक्याचे घडते सुंदर दर्शन

केज/प्रतिनिधी

केज शहराचे श्रद्धास्थान असलेल्या हजरत ख्वाजा मोहजेबोद्दिन रहमतुल्ला अलैह यांचा वार्षिक उर्स सोहळा दि.२० ऑगस्ट रोजी मोठ्या धार्मिक वातावरणात आणि उत्साहात साजरा केला जाणार आहे.हजरत ख्वाजा मोहजेबोद्दिन यांचा संदल हा इस्लामिक कॅलेंडर नुसार दरवर्षी ६ रब्बीउल अव्वल या तिथीनुसार पार पडतो. सर्वधर्मसमभावाचे प्रतीक असलेल्या या दर्ग्यामध्ये जात,धर्म,व पंथ भेदभावाच्या पलीकडे जाऊन सर्व समाजातील नागरिक दर्शनासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहतात.

उर्सची तयारी व भाविकांसाठी विशेष सोयी

उर्साच्या निमित्ताने केज शहरात जय्यत तयारी करण्यात आली आहे.बाहेरगावाहून येणाऱ्या हजारो भाविकांसाठी दर्गा कमेटीच्या वतीने भोजनाची विशेष व्यवस्था करण्यात आली असून,याला 'लंगरे ख्वाजा'असे म्हटले जाते.विशेष म्हणजे,या संपूर्ण उर्स व महाप्रसादाचा खर्च कोणतीही वर्गणी न घेता सर्व खतीब, काझी,इनामदार, किल्लेदार,सज्जादे आणि मुजावर मंडळी स्वतः करतात.तसेच लहान मुलांसाठी पाळणे व मनोरंजनाचे विविध खेळणी यात्रेत उपलब्ध असणार आहेत.मुख्य संदल व मिरवणूक सोहळा

उर्साच्या मुख्य दिवशी रात्री ९ वाजता हजरत ख्वाजा मोहजेबोद्दिन यांचा संदल पारंपरिक वाजत-गाजत दर्ग्यातून निघतो.हा संदल शहरातील बाबाराजे देशमुख यांच्या निवासस्थानी मानकरी व नागरिकांच्या स्वागतासाठी पोंहोचतो

या ठिकाणी राजकीय, सामाजिक,शासकीय, निमशासकीय अधिकारी तसेच शहरातून,ग्रामीण भागातून आणि इतर जिल्ह्यांतून आलेले हजारो नागरिक मोठ्या उत्साहाने उपस्थित राहतात.बाबाराजे



देशमुख यांच्या निवासस्थानी मुस्लिम धर्मगुरूंच्या उपस्थितीत संदलची खात्याखाली व विशेषदुवा मागितली जाते.त्यानंतर संपूर्ण गावातून संदलची भव्य मिरवणूक काढली जाते.मिरवणूक मार्गावर मानकऱ्यांच्या घोड्यावर हिंदू व मुस्लिम बांधवांच्या वतीने वेगवेगळे फुलांचे चादर अर्पण केले जातात.संदलची स्थापना व प्रसाद वितरण पहाटे ४ वाजता संदलची दर्ग्यात स्थापना केली जाते.दरवर्षीच्या प्रथेप्रमाणे मानकर्यांच्या हस्ते संदलची खात्याखाली सलाम होऊन उपस्थितांना महाप्रसाद (तबर्रुक) वाटप केला जातो.यासह संदलचा मुख्य कार्यक्रम संपन्न होतो.


कव्वालीचा कार्यक्रम व सलोखा

संदल सोऱ्या नंतर पुढील दोन दिवस भव्य कव्वालीच्या कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.केज शहरात हा उर्स हिंदू आणि मुस्लिम बांधव एकत्र येऊन अत्यंत सलोख्याने,एकोप्याने आणि आनंदाने साजरा करतात,जे संपूर्ण परिसरासाठी जातीय सलोख्याचे उत्तम उदाहरण ठरते अशी माहिती समस्त उर्स कमिटी व मुजावर मंडळी,केज यांनी प्रतिनिधीशी बोलताना दिली आहे.

# बीड जिल्हा काँग्रेस कमिटीची नवीन कार्यकारिणी जाहीर

केज/प्रतिनिधी

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रांताध्यक्ष श्री.हर्षवर्धन सपकाळ यांनी बीड जिल्हा काँग्रेस कमिटीच्या नवनिर्वाचित कार्यकारिणीच्या प्रस्तावास अधिकृत मान्यता दिली आहे. बीड जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राहुल सोनवणे यांनी पाठवलेल्या प्रस्तावाला मंजुरी देत प्रदेशकाँग्रेस चे वरिष्ठ उपाध्यक्ष ॲड. गणेश पाटील यांनी दि. १८ ऑगस्ट २०२६ रोजी ही अधिकृत यादी प्रसिद्ध केली आहे.या नवीन कार्यकारिणीत जिल्ह्यातील अनुभवी आणि अभ्यासू कार्यकर्त्यांना विविध पदांची जबाबदारी सोपवून पक्षाची ध्येयधोरणे आणि संघटन मजबूत करण्यावर भर देण्यात आला आहे.जिल्हा कार्यकारिणी उपाध्यक्ष पदी प्रविणकुमार भाऊराव शेप,नवनाथ रामनाथ थोटे,जुबेर मकराणी चाऊस, प्रकाशराव लक्ष्मणराव देशमुख,वसंतराव मोरे, अशोक विश्वनाथ बहिरवाळ,बिलकीस कच्छी,हनिफ करिम सय्यद,प्रविण योगीराज मेटे तर कोषाध्यक्ष म्हणुन बिपीनचंद्र शाहूराव ठोंबरे यांची निवड करण्यात आली आहे. यामध्ये सरचिटणीस म्हणुन रमेश पाटील, आझम पाशा,विश्वनाथ राव गायकवाड,अशोक बाजीराव केकाण, गणेश कल्याणराव शिंदे,हरिभाऊ सावंत, ॲड.विलास जोशी, बिबीषण बाबुराव रसाळ,श्रीनिवास बेदरे, मिलींद






बाबुराव मस्के, सिध्देश्वर देवराव रणदिवे,ज्ञानेश्वर आबासाहेब आंधळे, आनंदराव कोकाटे, एहेतेशाम खतीब,ॲड. इनामदार मशीयोद्दीन हबीबोद्दीन,शेख सिराज भाई,संभाजी जाधव,अशोक जगन्नाथ पायमोडे यांची निवड करण्यात आली.तसेच सचिव पदीॲड.विशाल मस्के, देविदास जीवराज गुंड, ॲड.सय्यद याकुब मेहमूद,रावसाहेब घाडगे,अनिल पालेकर, विजय सोनवणे, दादासाहेब ताकतोडे, मनोज महादेव इंगळे, अच्युत इंगळे,सोपान टेकाळे,अंकुशपाचपुते, मारोतीराव पवळ, पप्पु काका घुमरे यांची निवड झाली.तरकायम निमंत्रित सदस्य म्हणुन जिल्हा काँग्रेस कमिटी चे माजी अध्यक्ष व कार्याध्यक्ष, जिल्ह्यातील पक्षाचे माजी मंत्री,लोकसभा व विधानसभा निवडणुकीतील काँग्रेस पक्षाचे उमेदवार,माजी खासदार व माजी आमदार,प्रदेश कमिटी चे पदाधिकारी,आघाडी संघटनांचे जिल्हाध्यक्ष/कार्याध्यक्ष आणि जिल्हा परिषदेचे आजी -माजी अध्यक्ष, उपाध्यक्ष व गटनेते हे या कार्यकारिणीत कायम निमंत्रित सदस्य म्हणून समाविष्ट असणार आहेत. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना आपापल्या स्तरावरून तात्काळ नियुक्तीपत्रे देण्याचे निर्देश प्रदेश काँग्रेस कमिटीच्या वतीने देण्यात आले आहेत.या नवीन निवडीमुळे बीड जिल्ह्यात काँग्रेस पक्ष अधिक आक्रमक आणि बळकट होईल असा विश्वास राहुल सोनवणे यांनी व्यक्त केला आहे.

# डोईठाण येथे ‘रायबा मिसळ हाऊस’ चा २१ ऑगस्टला भव्य शुभारंभ

## महाराष्ट्र भूषण आ.सुरेश धस,विजय गोल्हार,सागर धस यांच्या शुभहस्ते उद्घाटन





आष्टी - (एस.राजेंद्र लाड) आष्टी तालुक्यातील डोईठाण येथे नव्या व्यवसायाची मुहूर्तमेढ रोवली जात असून, रायबा मिसळ हाऊस चा भव्य उद्घाटन समारंभ शुक्रवार, दि. २१ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी १० वाजता आयोजित करण्यात आला आहे.

‘आनंद होईल कमालीचा, जेव्हा आस्वाद घ्याल रायबा मिसळचा’ या आकर्षक घोषवाक्यासह सुरू होत असलेल्या या नव्या व्यवसायाच्या उद्घाटन सोहळ्याची परिसरात उत्सुकता निर्माण झाली आहे. ग्राहकांना चविष्ट आणि दर्जेदार मिसळीचा आस्वाद देण्याच्या उद्देशाने सुरू होत असलेल्या या व्यवसायाच्या माध्यमातून डोईठाण व परिसरातील खाद्यप्रेमींसाठी एक नवा पर्याय उपलब्ध होणार आहे.

‘रायबा मिसळ हाऊस’ चे उद्घाटन महाराष्ट्र भूषण मा. आ. सुरेश (आण्णा) धस, (विधानसभा सदस्य), मा. श्री. विजय (भाऊ) गोल्हार (माजी जिल्हा परिषद सदस्य,बीड) आणि मा. श्री. सागर (आप्पा) धस, (युवा नेते, आष्टी-पाटोदा-शिरूर) यांच्या शुभहस्ते होणार आहे. कार्यक्रमाला ह.भ.प. काशिनाथ महाराज (गणेश गड), ह.भ.प. काशिनाथ महाराज (सांगवी पाटण), ह.भ.प. आंधळे महाराज (माणिकदौडी), ह.भ.प. रोहिदास महाराज (हातोला) तसेच ह.भ.प. वशिष्ठ महाराज तरटे (डोईठाण) यांचे शुभाशीर्वाद लाभणार आहेत.

उद्घाटन सोहळ्यास दिलीप गर्जे, ज्योती महाडिक, छगण आण्णा तरटे, काकासाहेब तरटे, एन. के. आण्णा, श्याम गर्जे, तान्हाजी तरटे, रेवणनाथ तोतरे, बाळासाहेब सोनवणे, संदीप तरटे, मोहन तरटे, अशोक सरपंच (सुरूडी), एनटी भाऊ गर्जे, भाऊसाहेबजी लटपटे, अमोल चौधरी, युवा उद्योजक संतोष मरकड, साईदादा पोकळे, नवनाथ गर्जे (सरपंच, बावी), पोपट गर्जे, अमोल राजे तरटे, अभय गर्जे सरपंच, इंद्रजीत गर्जे (कापसी), वैभव गोल्हार, रामभाऊ सारूक, श्रीधर गर्जे, काकासाहेब गर्जे, वामन शिवाजी गर्जे, नितीन नाकाडे, दादासाहेब बोराडे, अनिल सकुंडे, श्रीकांत नन्नवरे, राजू ननवरे, लक्ष्मण नन्नवरे, अश्रुबा गोल्हार (कापसी), आजिनाथ गोल्हार, इंद्रजीत गर्जे, डॉ. श्रीराम तरटे, डॉ. बावदानकर, डॉ. सोनवणे, डॉ. शरद गर्जे, ड. प्रतीक्षा डावकर, सतीश शेठ तोतरे, डॉ. सतीश तोतरे, शिवाजीराव नाकाडे, गणेशजी सपकाळ, लक्ष्मण जगताप, नवनाथ आबा, आश्रूवा खलाटे, विष्णू कुराडे, डॉ. युवराज तरटे, संदीप खराटे, पोपट गोल्हार, अशोक शेठ तोतरे, बाळासाहेब गर्जे सरपंच, रमेश खलाटे, शेषराव फौजी, दत्ता तोतरे, शिवाजी गर्जे सरपंच, शंकर मिसाळ, कारभारी गर्जे फौजी, आवा नाना तरटे, विठ्ठल गर्जे (मोराळा), कृष्णा मिसाळ, सारूक मामा, उमाकांत भाऊ तरटे, अविनाश नाकाडे, विष्णू भोसले, रोहिदास साबळे सरपंच, चांगदेव गुरूजी, आप्पासाहेब तरटे फिटर, मनोज तरटे फिटर, काकासाहेब तरटे टेलर, दादासाहेब तोतरे, राजू काका तरटे, आरिफ भाई, डॉ. बाबू तोतरे, दत्ता नाना, सुभाष भागवत तरटे, संकेत भैय्या तरटे, उद्धव नाकाडे पाटील आणि अविनाश तरटे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

दरम्यान, या व्यवसायाच्या शुभारंभासाठी रेवणनाथ खाडे, प्रशांत तरटे, बाबू तोतरे, विठ्ठल भाऊ तरटे, गणेश बापू तरटे, तुकाराम खाडे, विठ्ठल नाना खाडे, लक्ष्मण खाडे, श्रीकांत खाडे, रवी खाडे, मारुती खाडे, अक्षय खाडे, हनुमंत खाडे, पवन भैय्या खाडे, संतोष खाडे, निखील भैय्या खाडे, संतोष राऊत, वालू मोरे, अभिमान्यु साळुंखे, पांडुरंग राऊत, अशोक भैय्या तरटे, प्रशांत दाणी, जावेद शेख, सुधीर तरटे, पवन तरटे आणि कुणाल तरटे यांनी पुढाकार घेतला आहे. नव्या व्यवसायाच्या माध्यमातून स्थानिक पातळीवर उद्योजकतेला चालना मिळावी, तसेच परिसरातील नागरिकांना चांगल्या दर्जाचा खाद्यपदार्थ उपलब्ध व्हावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

डोईठाण येथे होणाऱ्या या उद्घाटन सोहळ्यास परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून नव्या व्यवसायाला शुभेच्छा व आशीर्वाद द्यावेत आणि कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. ‘रायबा मिसळ हाऊस’ च्या शुभारंभामुळे डोईठाणच्या खाद्यसंस्कृतीत आणखी एका नव्या व्यवसायाची भर पडणार असून, २१ ऑगस्ट रोजी होणाऱ्या उद्घाटन सोहळ्याकडे परिसराचे लक्ष लागले आहे.

# मुख्यमंत्री सहायता निधीतून गरजू रुग्णांना १ लाख ७० हजारांचा आधार

## आ.सुरेश धस यांच्या पाठपुराव्याला यश;आर्थिक अडचणींमुळे उपचार थांबू नयेत,यासाठी सातत्याने प्रयत्न

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) गंभीर आजारांवरील उपचारांचा वाढता खर्च आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांसाठी मोठे आव्हान ठरत असताना, केवळ पैशांअभावी कोणत्याही रुग्णाचा उपचार थांबू नये, या उद्देशाने आष्टी विधानसभा मतदारसंघाचे आमदार आ. सुरेश धस यांच्या माध्यमातून गरजू रुग्णांना मुख्यमंत्री सहायता निधीतून आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला जात आहे. या प्रयत्नांना यश आले असून आष्टी तालुक्यातील दोन आणि जामखेड तालुक्यातील एका अशा तीन गरजू रुग्णांना वैद्यकीय उपचारासाठी मुख्यमंत्री सहायता निधीतून एकूण १ लाख ७० हजार रुपयांची मदत मंजूर झाली आहे.

घुमरी पिंपरी, ता. आष्टी येथील जनाबाई पांडुळे यांच्या वैद्यकीय उपचारासाठी ८० हजार रुपये, गणगेवाडी, ता. आष्टी येथील ज्ञानदेव गणगे यांच्या उपचारासाठी ५० हजार रुपये, तर वंजारवाडी, ता. जामखेड येथील अशोक जायभाय यांच्या वैद्यकीय उपचारासाठी ४० हजार रुपये मुख्यमंत्री सहायता निधीतून मंजूर करण्यात आले आहेत. या आर्थिक मदतीमुळे संबंधित रुग्णांच्या कुटुंबीयांना मोठा दिलासा मिळाला असून उपचाराचा आर्थिक भार काही प्रमाणात हलका होण्यास मदत झाली आहे.



आजारपणाचा सामना करताना उपचारांसाठी मोठा खर्च उभा राहिल्यास सर्वसामान्य कुटुंबांपुढे गंभीर आर्थिक संकट निर्माण होते. अशा परिस्थितीत मुख्यमंत्री सहायता निधीतून मिळणारी मदत ही केवळ आर्थिक मदत न राहता रुग्णांच्या उपचारांना गती देणारा महत्त्वपूर्ण आधार ठरते. गरजू रुग्णांची प्रकरणे शासनापर्यंत पोहोचवून त्यांना आवश्यक ती मदत मिळवून देण्यासाठी आ. सुरेश धस यांच्या माध्यमातून सातत्याने प्रयत्न केले जात आहेत.‘रुग्णसेवा थांबता कामा नये!’

केवळ पैशांअभावी कोणत्याही रुग्णाला उपचारापासून वंचित राहावे लागू नये, ही भूमिका ठेवून आ. सुरेश धस यांच्या माध्यमातून वैद्यकीय मदतीसाठी प्रयत्न सुरू आहेत. रुग्ण आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या अडचणी समजून घेऊन मुख्यमंत्री सहायता निधी, आयुष्यमान भारत योजना तसेच शासनाच्या इतर विविध योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांना मिळवून देण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही केली जात आहे. गरजू कुटुंबाच्या अडचणीच्या काळात त्यांच्या पाठीशी उभे राहणे, उपचारासाठी आर्थिक मदत उपलब्ध करून देणे आणि शासनाच्या योजना शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवणे, या माध्यमातून लोकप्रतिनिधी म्हणून आ. सुरेश धस यांच्या रुग्णसेवेची बांधिलकी अधोरेखित होत आहे.

दरम्यान, ६ ऑगस्ट रोजी मुख्यमंत्री ना. देवेंद्रजी फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आष्टी येथे आयोजित करण्यात आलेल्या मुख्यमंत्री मोफत महाआरोग्य शिबिरातूनही अनेक गरजू रुग्णांना तपासणी, मार्गदर्शन आणि पुढील उपचाराची सुविधा उपलब्ध झाली. या महाआरोग्य शिबिरामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना विविध आरोग्यसेवा एकाच ठिकाणी उपलब्ध झाल्याने अनेक रुग्णांना मोठा दिलासा मिळाला.महाआरोग्य शिबिरातून मोफत उपचार; अनिल डहाळे यांना मोठा दिलासा

आ. सुरेश धस यांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आलेल्या या मुख्यमंत्री मोफत महाआरोग्य शिबिराचा लाभ अनिल डहाळे यांनाही मिळाला. त्यांना श्वसनाचा त्रास होत असल्याने शिबिरात त्यांची तपासणी करण्यात आली. तपासणीनंतर पुढील उपचारासाठी त्यांना पुणे येथील ससून रुग्णालयात पाठविण्यात आले. तेथे त्यांना मोफत उपचाराचा लाभ मिळाला.उपचारासाठी स्वतःच्या खिशातून एकही रुपया खर्च झाला नसल्याचे सांगताना अनिल डहाळे यांनी या महाआरोग्य शिबिरामुळे आपल्याला मोठा दिलासा मिळाल्याची भावना व्यक्त केली. गरजू रुग्णांसाठी आरोग्याची मोठी सुविधा उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांनी मुख्यमंत्री ना. देवेंद्रजी फडणवीस, आ. सुरेश धस तसेच महाआरोग्य शिबिराच्या संपूर्ण टीमचे मनःपूर्वक आभार मानले.

ग्रामीण आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील रुग्णांना वेळेत तपासणी, योग्य मार्गदर्शन आणि आवश्यक उपचार मिळणे अत्यंत महत्त्वाचे आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री सहायता निधी, आयुष्यमान भारत योजना आणि महाआरोग्य शिबिरासारख्या उपक्रमांच्या माध्यमातून गरजू रुग्णांना मदतीचा हात देण्याचे काम सुरू आहे. पैशांअभावी कोणाचाही उपचार रखडू नये, रुग्णांना वेळेत उपचार मिळावेत आणि त्यांच्या कुटुंबीयांवरील आर्थिक भार कमी व्हावा, यासाठी यापुढेही शासनाच्या विविध योजनांचा लाभ गरजूंपर्यंत पोहोचविण्याचे कार्य सुरूच राहणार

# आदर्श शिक्षक भानुदास केरू गायकवाड (आण्णा) यांचे निधन

## वेलतूरी येथे शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार



आष्टी - (एस.राजेंद्र लाड) वेलतूरी येथील रहिवासी तथा सामाजिक, शैक्षणिक आणि विविध क्षेत्रांशी जिव्हाळ्याचे संबंध असलेले भानुदास केरू गायकवाड सर (आण्णा) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनाने वेलतूरी परिसरात शोककळा पसरली असून, त्यांच्या जाण्याने नातेवाईक, मित्रपरिवार, ग्रामस्थ तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांनी हळहळ व्यक्त केली.

भानुदास केरू गायकवाड (आण्णा) यांच्या पार्थिवावर मंगळवार, दि. १८ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता वेलतूरी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. अंत्यविधीसाठी राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक आदी विविध क्षेत्रांतील मान्यवरांसह नातेवाईक, मित्रपरिवार आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गायकवाड सर (आण्णा) यांच्या निधनाचे वृत्त समजताच परिसरातील नागरिकांनी त्यांच्या निवासस्थानी जाऊन अंत्यदर्शन घेतले. त्यांच्या कार्याची, प्रेमळ स्वभावाची आणि सर्वांशी असलेल्या जिव्हाळ्याच्या संबंधांची यावेळी उपस्थितांकडून आठवण काढण्यात आली. त्यांच्या निधनाने कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून, वेलतूरी परिसराने एक आपुलकीचे व्यक्तिमत्त्व गमावल्याची भावना व्यक्त करण्यात आली. अंत्यविधीप्रसंगी उपस्थित मान्यवर, नातेवाईक, मित्रपरिवार व ग्रामस्थांनी भानुदास केरू गायकवाड सर (आण्णा) यांना भावपूर्ण आदरांजली अर्पण केली. त्यांच्या पश्चात कुटुंबीय, नातेवाईक व आप्तेष्ट असा परिवार आहे.

# योगेश्वरी सैनिक स्कूलमध्ये स्वातंत्र्य दिनानिमित्त देशभक्तीतून

## पर्यावरण संदेश देण्यासाठी सैनिक स्कूलमध्ये वृक्षारोपण - प्राचार्य, मेजर एस पी कुलकर्णी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने योगेश्वरी सैनिक स्कूलमध्ये ‘एक पेड़ शहीदों के नाम’ अभियानांतर्गत वृक्षारोपण करण्यात आले. देशासाठी बलिदान देणाऱ्या शहीदांना वृक्षारोपणाच्या माध्यमातून मानवंदना देत विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रभक्तीसोबतच पर्यावरण संवर्धनाची भावना निर्माण करण्याचा संदेश यावेळी देण्यात आला. कार्यक्रमाचे मार्गदर्शन प्राचार्य मेजर एस. पी. कुलकर्णी यांनी केले.

यावेळी बोलताना प्राचार्य मेजर एस. पी. कुलकर्णी म्हणाले की, निसर्ग संवेदना जागृती आज अत्यंत आवश्यक आहे. युवक ही देशाची ताकद असून शिक्षणाबरोबरच त्यांच्यामध्ये निसर्ग, पर्यावरण आणि राष्ट्र यांच्याविषयी आंतरिक जिव्हाळा निर्माण झाला पाहिजे. ‘एक पेड़ शहीदों के नाम’ या अभियानातून शहीदांच्या स्मृती जपत पर्यावरण संवर्धनाचा संदेश भावी पिढीपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला जात आहे.

आज निसर्गचक्र विस्कळीत झाले असून त्यावर प्रभावी उपाय म्हणून मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धनाची



गरज असल्याचे त्यांनी सांगितले. योगेश्वरी सैनिक स्कूलमध्ये ‘ऑपरेशन ग्रीन अर्थ’, ‘माय ड्युटी’, ‘ऑक्सिजन पार्क’ यांसारख्या उपक्रमांतून विद्यार्थ्यांमध्ये जल, जमीन आणि जंगल यांच्याविषयी संवेदनशीलता निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. पर्यावरणाचा ऱ्हास थांबविण्यासाठी केवळ व्यक्तिगत प्रयत्न पुरेसे नसून व्यापक लोकचळवळ उभी राहणे आवश्यक आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

मानवाच्या अस्तित्वासाठी पर्यावरणाचे महत्त्व विद्यार्थ्यांनी आणि समाजाने समजून घेणे गरजेचे आहे. निसर्गाशी एकरूप होऊनच भावी पिढ्यांना सुरक्षित, सुंदर आणि निरोगी जीवन देता येईल. पर्यावरण संवर्धनासाठी प्रत्येकाने आपली जबाबदारी ओळखून कार्य करण्याचे आवाहन प्राचार्य कुलकर्णी यांनी केले.

सैनिकांचा गौरव

याच कार्यक्रमांतर्गत ‘सन्मान राष्ट्रभक्तीचा, गौरव सैनिकांचा’ या अभियानातून भारतीय सैन्यदलात सेवा बजावलेले सुभेदार दशरथ शिंदे आणि सुभाष घोडके यांचा योगेश्वरी सैनिक स्कूलच्या वतीने स्मृतिचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. तसेच शहीद बाबासाहेब केंद्रे यांच्या मातोश्री कुसुमताई केंद्रे यांचाही यावेळी सन्मान करून शहीदांच्या त्यागाला मानवंदना देण्यात आली.

कार्यक्रमास संस्थेचे कार्यकुशल सचिव, कमलाकर चौसाळकर, ज्येष्ठ सल्लागार माणिकराव लोमटे, ॲड. प्रताप पवार सर, उपप्राचार्य कुलकर्णी सर, अधीक्षक, प्रशांत बर्दापूरकर यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.शहीदांच्या स्मृतींना वृक्षरूपी अभिवादन आणि पर्यावरण संवर्धनातून राष्ट्रसेवा, असा प्रेरणादायी संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

# ’जेन झी’ ने वास्तव स्वीकारून स्पर्धा परीक्षांची तयारी करावी : तहसीलदार आनंद देऊळगावकर

मुदखेड, दि. १८ ऑगस्ट २०२६ : आजची ’जेन झी’ पिढी ही तंत्रज्ञानाच्या युगात वाढलेली पिढी असून तिच्याकडे ज्ञान, माहिती आणि विविध संधींची कमतरता नाही. मात्र, डिजिटल माध्यमांचा योग्य वापर करून विद्यार्थ्यांनी आपल्या क्षमता व परिस्थितीची वास्तविकता स्वीकारणे आवश्यक आहे. सोशल मीडिया ऋआणि मोबाईलच्या आहारी न जाता त्यांचा ज्ञानार्जनासाठी प्रभावी वापर करावा आणि वास्तववादी ध्येय निश्चित करून स्पर्धा परीक्षांची तयारी करावी, असे प्रतिपादन मुदखेडचे तहसीलदार आनंद देऊळगावकर यांनी केले.

राजीव गांधी महाविद्यालय, मुदखेड येथे नव्याने प्रवेशित बी.ए., बी.कॉम. व बी.एस्सी. प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित ‘विद्यार्थी प्रवेश प्रेरणा कार्यक्रमात’ ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

‘पदवीनंतर करिअरच्या संधी व स्पर्धा परीक्षेची तयारी’ हा कार्यक्रमाचा प्रमुख विषय होता. यावेळी तहसीलदार आनंद देऊळगावकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळविण्यासाठी केवळ मोठी स्वप्ने पाहणे पुरेसे नसून स्वतःची क्षमता, उपलब्ध वेळ, परिस्थिती आणि स्पर्धेचे वास्तव समजून घेणे गरजेचे आहे. जेन झीने कडे डिजिटल साधनांची मोठी ताकद आहे. या साधनांचा मनोरंजनापेक्षा अभ्यास, माहिती संकलन, चालू घडामोडी आणि ज्ञानवृद्धीसाठी उपयोग केल्यास त्याचा निश्चितच फायदा होईल.

विद्यार्थ्यांनी वेळेचे नियोजन, सातत्यपूर्ण अभ्यास, योग्य संदर्भ साहित्य, सराव परीक्षा आणि आत्मपरीक्षण यावर भर द्यावा. स्पर्धा परीक्षेतील अपयशाला घाबरून न जाता त्यातून आपल्या चुका ओळखून पुन्हा प्रयत्न करण्याची मानसिकता विकसित करावी. पदवी शिक्षणासोबतच भविष्यातील करिअरचे नियोजन केल्यास विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रांतील संधींचा प्रभावीपणे लाभ घेता




येईल, असेही त्यांनी नमूद केले.

प्रमुख साधन व्यक्ती म्हणून पीपल्स कॉलेज, नांदेड चे उप प्राचार्य डॉ. विशाल पतंगे हे उपस्थित होते. त्यांनी पदवीनंतरच्या विविध करिअरच्या संधी तसेच स्पर्धा परीक्षांचे स्वरूप, अभ्यासक्रम, संदर्भ साहित्य, वेळेचे व्यवस्थापन आणि अभ्यासाचे नियोजन याबाबत विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले. पदवीच्या शिक्षणासोबतच स्पर्धा परीक्षांची तयारी केल्यास विद्यार्थ्यांना भविष्यातील संधींचा प्रभावीपणे लाभ घेता येईल, असे त्यांनी सांगितले.

अध्यक्षीय मनोगतात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. टी. शिंदे यांनी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयीन शिक्षणाचा केवळ पदवी मिळविण्यासाठी उपयोग न करता ज्ञान, कौशल्य आणि व्यक्तिमत्त्व विकासासाठी करावा, असे आवाहन केले. विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीनुसार करिअरची दिशा निश्चित करून त्यासाठी सातत्याने प्रयत्न करावेत, असे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अर्जुनसिंग ठाकूर यांनी केले. प्रास्ताविक विद्यार्थी प्रवेश प्रेरणा कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. महेश पाटील यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. ऋषिकेश मुंगल यांनी केले.

कार्यक्रमादरम्यान नव्याने प्रवेशित विद्यार्थ्यांचे स्वागत करून महाविद्यालयातील शैक्षणिक व सहशैक्षणिक उपक्रम, विविध सुविधा, नियम आणि उपलब्ध संधींची माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांनी कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद देत मान्यवरांशी संवाद साधला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले. कार्यक्रमास प्रथम वर्षाचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. नव्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन जीवनाची सकारात्मक सुरुवात करून देतानाच करिअर नियोजन आणि स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी योग्य दिशा व प्रेरणा देणे, हा कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश होता.

दैनिक समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
राजमान्य-राजश्री

बीड (महाराष्ट्र)
BEED (MAHARASHTRA )

नांदेड

बुधवार दि.१९ ऑगस्ट २०२६
WEDNESDAY, DT.19 AUGUST 2026



# कृष्णापूर येथील शेतात बिबट्याचा थरारक रेस्क्यू

## लोहा वन परिमंडळातील घटना; चार तासांच्या अथक प्रयत्नानंतर वनविभागाला यश

तामसा -(प्रतिनिधी )हदगाव तालुक्यातील कृष्णापूर येथे शेतातील गजरा गवताच्या दाट पिकात बिबट्या लपल्याची माहिती मिळाल्यानंतर वनविभागाच्या पथकाची तब्बल चार तास धावपळ सुरू होती. अखेर गजरा गवताच्या शेतात ट्रॅक्टरच्या सहाय्याने शोधमोहीम राबवून बिबट्याचा बछडा मृत अवस्थेत ताब्यात घेण्यात आला. मृत का होईना पण बिबट्याचे पिल्लू सापडल्याने वन विभाग, शेतकरी व ग्रामस्थांनी सुटकेचा नि:श्वास सोडला असला तरी बछड्याचा मृत्यू कशाने झाला? याबाबत अनेक तर्कवितर्क लावले जात आहे.

हदगाव वन परिक्षेत्रांर्गत येणाऱ्या लोहा वन परिमंडळातील कृष्णापूर येथील दत्ता आनंदराव पवार यांच्या गट क्रमांक ४३ मधील शेतात जनावरांसाठी चारा असलेल्या गजरा गवताच्या दाट पिकात बिबट्या लपल्याची माहिती दि. १८ रोजी मंगळवारी सकाळी ९ वाजताच्या सुमारास निदर्शनात आल्याने शेतकऱ्यांत खळबळ उडाली होती. सगळा गाव घटनास्थळी जमा झाला होता. वन विभागाला माहिती देण्यात आली. घटनेची माहिती मिळताच हदगाव वनपरिक्षेत्र अधिकारी किशन खंदारे यांच्या मार्गदर्शनाखाली वनविभागाचे पथक घटनास्थळी दाखल झाले. त्याच आखाड्यावरील कुत्र्यांवर बिबट्याने हल्ला करुन एका कुत्र्याचा फडशा पाडला तर दुसऱ्या कुत्र्यावर हल्ला करून त्याचे कान फाडल्याचे पुढे आले. यामुळे शेतकरी, ग्रामस्थ भयभीत झाले होते. घटनेची माहिती



माजी आमदार माधवराव पाटील जवळगावकर यांना कळताच ते घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी वन विभागाला तात्काळ कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. नांदेडचे वन्यजीव रक्षक अनिंद्र कट्टी यांनी वन अधिकारी, कर्मचाऱ्यांना सोबत घेऊन परिस्थितीचा अंदाज घेत गजरा गवताच्या दाट शेतात शोधमोहीम सुरू केली. बिबट्या असल्याची खात्री करुन अत्यंत सावधपणे रेस्क्यू ऑपरेशन केले. गजरा गवत दाट असल्याने बिबट्याचा शोध घेणे वनकर्मचाऱ्यांसाठी मोठे आव्हान होते. अखेर, ट्रॅक्टरच्या सहाय्याने शोधमोहीम पुढे नेली. तब्बल चार तासांच्या अथक प्रयत्नानंतर बिबट्याचा बछडा सापडला. पण बछडा मृत अवस्थेत आढळल्याने सगळेच गोंधळून गेले. बछड्याच्या मृत्यूचे कारण स्पष्ट झालेले नसून शवविच्छेदनानंतरच कारण स्पष्ट होणार आहे. मृत बिबट्याच्या बछड्याला हदगाव येथे शवविच्छेदनासाठी नेले असून वनविभागाकडून बछड्याची आवश्यक तपासणी व पुढील कार्यवाही सुरू आहे.

एकंदरीत घटनेमुळे कृष्णापूर परिसरात पुन्हा एकदा मानव-वन्यजीव संघर्षाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. शेतशिवारात वाढलेली पिके, वन्यप्राण्यांची वाढती वर्दळ आणि रात्रीच्या वेळी शेतात जाणाऱ्या शेतकऱ्यांची व जनावरांची सुरक्षेबाबत वनविभागाने जनजागृती करणे गरजेचे आहे. बिबट्याचा मृत बछडा सापडल्याने तात्पुरता दिलासा मिळाला, परंतू परिसरात बिबट्याची आणखी वर्दळ आहे का? याचा वनविभागाने गांभीर्याने शोध घेणे आवश्यक आहे. चार तासांच्या या रेस्क्यू मोहिमेत वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी दाखविलेल्या संयम, दक्षता आणि धाडसाचे ग्रामस्थांकडून कौतुक होत आहे. रेस्क्यू मोहिमेत लोहा वनपाल ए. डी. वडजे,पोलीस पाटील बालाजी कडबे,तामसा श्रीमती डी. डी. विभुते, वनपाल सुनील ढगे, वनरक्षक एन. एल. चव्हाण, वनरक्षक श्रीमती व्ही. एच. मुसळे, वनरक्षक श्रीमती निर्जला भातमोडे, नितीन चव्हाण, हर्षल चव्हाण, बालाजी बनसोडे, चाटसे, वन मजूर किसन नरवाडे, राजू देवडे, अनिल मुळेकर, बालाजी ढोले, राहुल राठोड, ट्रॅक्टर चालक हनुमान सरकुंडे, रेस्क्यू टीमचे अविनाश वागतकर यांनी अथक परिश्रम घेतले.

## नांदेड जिल्ह्यातील तेली समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्काराचे आयोजन

गुणवंत विद्यार्थ्यांनी नोंदणी करावी असे आवाहन केले आहे

अर्धापूर - जिल्ह्यातील तेली समाज सेवा भावी संस्थेच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात येणार असल्याची माहिती प्रसिद्धी प्रत्रकाव्दारे दिऊ आहे. प्रतिवर्षी प्रमाणे तेली समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा व विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या मान्यवरांचा सत्कार दि. २३ ऑगस्ट रोजी आयोजित केला आहे.

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये गुणवंत विद्यार्थ्यांने आपल्या गुणपत्रकाची माहिती प्रत सदरील ग्रुपवर टाकून त्याखाली आपले नाव,वर्ग कळवावा संपर्क मोबाईल नंबर शक्यतो

झेरॉक्स प्रत पीडीएफ करून टाकावेत. वर्ग पहिली ते चौथी, पाचवी ते आठवी तसेच शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी वर्ग दहावी-बारावी, बी.कॉम, बीएससी, डी.फार्म, बी. फार्म, फार्मसी, बीएमएस, एमबीबीएस, सेट-नेट ,सिईटी आदी परीक्षेतील विद्यार्थ्यांनी ७५ टक्का पेक्षा जास्त गुण असणे आवश्यक आहे. बीएचएमएस, बीएएमएस, बीडीएस, एमबीबीएस, एमडी, नीट परीक्षा प्रवेश पात्र विद्यार्थी व उत्तीर्ण विद्यार्थी

तसेच विविध कला या क्षेत्रात राज्य व केंद्रीय स्तरावर प्रमाणपत्र मिळालेले विद्यार्थी यांनी नाव नोंदणी करावी.

फॉर्म भरल्यानंतर आपले प्रमाणपत्र व फॉर्म भरलेला स्क्रीन शॉट ग्रुरुपवर टाकावा, असे आवाहन तेली समाज सेवाभावी संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

## बीएलओची मतदार शोध मोहीम अंतिम टप्प्यात स्थलांतरित, मृत्यु , दुबार मतदार यादीतून होणार बाद

मुदखेड प्रतिनिधी :- तालुक्यात विशेष मतदार यादी पुनरीक्षण मोहीम तहसील प्रशासनामार्फत प्रभावीपणे राबवली जात असून प्रत्येक गावातील बीएलओ ना मतदार शोधताना पायपीट करावी लागत आहे . मतदार यादीतील मतदार प्रत्यक्षात गावातच राहत नसल्याचे चित्रसमोर आले असून अनेक घरे बंद तर काही कुटुंबे कायमस्वरूपी स्थलांतरित असल्याचे आढळून आले आहे . गेल्या अनेक वर्षापासून मतदार यादीत असलेल्या वृत्त व्यक्तींना वगळण्यात येत असून नवीन मतदार यादी शुद्धीकरणाची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आली असली तरीही गायब असलेले मतदार नव्या यादीतून डिलीट होणार असल्याच्या धास्तीने लोकप्रतिनिधी बीएलओची मात्र तारांबळ उडाली आहे .



भारत निवडणूक आयोग विशेष मतदार यादी पुनरीक्षण मोहीम अंतर्गत सन २००२ मतदार यादी नव्याने तयार केली जात आहे . यासाठी तालुक्यातील प्रत्येक गावात मतदार यादी दुरुस्ती प्रक्रियेचे काम प्रगतीपथावर आहे . उपविभागीय अधिकारी प्रवीण मेंगशेट्टी , तहसीलदार आनंद देऊळगावकर , पंचायत समिती गटविकास अधिकारी शेखर देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभावीपणे राबवली जात आहे . तहसील प्रशासनाने गाव पातळीवर शासकीय बीएलओची नियुक्ती केली आहे . यासोबत प्रमुख राजकीय पक्षाने प्रशासनाला सहकार्य करण्यासाठी बीएलओ नियुक्त केले आहेत . नवीन मतदार यादी शुद्धीकरणाची प्रक्रिया ता २०जून २०२६ पासून वेगात सुरू आहे . प्रत्येक गावात याबाबत जनजागृती करण्यासाठी नायब तहसीलदार मारुती जाधव , नायब तहसीलदार विजयकुमार पाटे , नायब तहसीलदार संतोष कामठेकर यांच्यासह तलाठी , ग्रामसेवक , शिक्षक , अंगणवाडी सेविका , सेवाभावी संस्था आदींनी पुढाकार घेतला आहे .मतदार यादी शुद्धीकरण प्रक्रिया राबवित असताना बीएलओ यांना सर्व बाबीची बारकाईने तपासणी करावी लागत आहे . रोजगार शिक्षण व्यवसायासाठी शहराकडे स्थलांतरित झालेल्या अनेक कुटुंबीयांची नावे अद्यापही गावातील मतदार यादीत कायम असल्याचे पडताळणीत आढळून आले आहे.

# पावसाची सरासरी केवळ ४८ टक्के;जिल्ह्यात ५० टँकरद्वारे पाणीपुरवठा

## ऑगस्ट अर्धा संपला तूट कायम, नदी-नाले कोरडेच, प्रकल्प तळाला

बीड / प्रतिनिधी

यंदाच्या पावसाळ्यात बीड जिल्ह्यावर वरुणराजाने अवकृपा केल्याचे चित्र आहे. ऑगस्ट महिन्याचा पंधरवडा उलटून गेला असला तरी, जिल्ह्याने अद्याप पावसाचा ५० टक्क्यांचा टप्पाही गाठलेला नाही. परिणामी, जिल्ह्याच्या शहरी व ग्रामीण भागात भीषण पाणीटंचाई निर्माण झाली असून, सध्या १८ गावे आणि २३ वाड्यांची तहान ५० टँकरद्वारे भागवली जात आहे. पावसाळा संपत आला तरी विहिरी आणि नद्या कोरड्याच असल्याने बळीराजासह नागरिक मोठ्या चिंतेत आहेत.

जिल्ह्याचे वार्षिक सरासरी पर्जन्यमान ५६६ मिमी इतके आहे. मात्र, १ जून ते १६ ऑगस्ट या कालावधीत जिल्ह्यात केवळ २७४ मिमी पावसाची नोंद झाली आहे. हे प्रमाण एकूण सरासरीच्या केवळ ४८ टक्के इतकेच आहे. प्रशासनाने पाणीटंचाईवर मात करण्यासाठी तातडीने पावले उचलली असून, पिण्याचे पाणी पुरवण्यासाठी युद्धपातळीवर नियोजन केले आहे. शहरी भागात एकूण २४ टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे. यामध्ये पाटोदा शहरात १० तर आष्टीमध्ये १४ टँकरचा समावेश आहे. बीड जिल्ह्याचा भौगोलिक इतिहास पाहता, येथे परतीच्या पावसाचे प्रमाण नेहमीच लक्षणीय असते. आता पावसाळ्याचा शेवटचा टप्पा सुरू झाला असून, ऑगस्टच्या अखेरीस आणि सप्टेंबर महिन्यात दमदार पाऊस होईल, अशी भाबडी आशा शेतकरी आणि नागरिक बाळगून आहेत.




विशेषतः अत्यंत कमी पाऊस झालेल्या गेवराई, आष्टी आणि वडवणी या तालुक्यांमध्ये करपणाऱ्या खरीप पिकांना जीवदान मिळण्यासाठी तात्काळ जोरदार पावसाची आवश्यकता आहे. आगामी काळात बीडकरांना टंचाई आणि भीषण दुष्काळाला सामोरे जावे लागण्याची दाट शक्यता आहे. जिल्ह्यातील पावसाच्या आकडेवारीचे विश्लेषण केल्यास पावसाच्या विषम वितरणाचे स्पष्ट चित्र दिसून येते, जिल्ह्यात सर्वाधिक म्हणजेच ४१४.६ मिमी (७१.० टक्के) पाऊस झालेला केज तालुका आघाडीवर आहे, तर त्याखालोखाल पाटोदा (२८८.४ मिमी, ५३.५ टक्के), परळी वैजनाथ (३२३.९ मिमी, ५१.६ टक्के) आणि धारूर (३४२.४ मिमी, ५१.१ टक्के) या तालुक्यांनीही पन्नास टक्क्यांचा टप्पा ओलांडून मोठा दिलासा दिला आहे. दुसऱ्या गटात ४० ते ५० टक्क्यांच्या दरम्यान पाऊस झालेल्या मध्यम स्थितीतील तालुक्यांचा समावेश होतो; ज्यामध्ये माजलगाव (२७८.९ मिमी, ४५.२ टक्के), शिरूर कासार (२३२.२ मिमी, ४५.० टक्के), बीड (२६१.१ मिमी, ४३.९ टक्के) आणि अंबाजोगाई (२७६.८ मिमी, ४३.८ टक्के) या तालुक्यांनी सरासरीच्या जवळपास निम्म्यापर्यंत मजल मारली आहे.या तीन तालुक्यांत टंचाई : वडवणी, आष्टी व गेवराई या तीन तालुक्यातील ४० टक्क्यांपेक्षा कमी पाऊस नोंदवला गेला आहे. वडवणी (२३५.४ मिमी, ३९.२ टक्के) आणि आष्टी (२०९.० मिमी, ३८.३ टक्के) यांच्या पाठोपाठ जिल्ह्यात सर्वात कमी म्हणजे केवळ २१२.५ मिमी (३६.२ टक्के) गेवराई तालुक्यात झाला आहे,

## जिल्हा रुग्णालयातील धक्कादायक प्रकार

# सिझेरियननंतर पोटात राहिले कापड

बीड, (प्रतिनिधी) : जिल्हा रुग्णालयातील सिझेरियन शस्त्रक्रियेदरम्यान डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे १९ वर्षीय नवविवाहितेच्या पोटात कापड राहिल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. या कापडामुळे संसर्ग होऊन आतड्यांना गंभीर इजा झाल्याचे सांगण्यात येत असून, उपचारादरम्यान तिचे गर्भाशय काढावे लागले आहे. सध्या तिची प्रकृती चिंताजनक असून ती पुण्यातील ससून रुग्णालयात उपचार घेत आहे.

वडवणी येथील संध्या सूरज गायकवाड (वय १९) यांना प्रसूतीसाठी १ ऑगस्ट रोजी बीड जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. सिझेरियन शस्त्रक्रियेनंतर त्यांना रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला. मात्र, त्यानंतर त्यांना पोटदुखी व तापाचा त्रास सुरू झाला. प्रकृती अधिक खालावल्याने त्यांना पुढील उपचारासाठी पुण्यातील ससून रुग्णालयात दाखल करण्यात आले.ससून रुग्णालयातील तपासणीनंतर सिझेरियनच्या वेळी पोटात कापड राहिल्यामुळे संसर्ग होऊन आतड्यांना गंभीर नुकसान झाल्याचे कुटुंबीयांकडून सांगण्यात



आले. त्यानंतर संध्यावर दोन शस्त्रक्रिया करण्यात आल्या. या उपचारादरम्यान आतड्यांचा काही भाग तसेच गर्भाशय काढावे लागल्याचे सांगण्यात आले आहे.

या प्रकरणी संध्याची आई शीला उजगरे यांनी जिल्हा शल्यचिकित्सकांची भेट घेऊन संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी केली. यावेळी सामाजिक कार्यकर्ते शेषराव जगताप, अमरसिंह मसके यांच्यासह इतर उपस्थित होते. प्रकरणाची चौकशी करण्यासाठी समिती नियुक्त करून अहवालाच्या आधारे पुढील कारवाई केली जाणार असल्याचे समजते.दरम्यान, या गंभीर प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर योग्य ती कारवाई करण्याची मागणी कुटुंबीय व सामाजिक कार्यकर्त्यांकडून करण्यात आली आहे.

### जिल्हा रुग्णालयाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह

सिझेरियन शस्त्रक्रियेनंतर महिलेच्या पोटात कापड, हातमोजे व कागदी नॅपकीन राहिल्याच्या आरोपाने जिल्हा रुग्णालयाच्या कारभारावर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. नातेवाईकांच्या म्हणण्यानुसार, शस्त्रक्रियेनंतर संबंधित महिलेला पोटदुखी व इतर त्रास सुरू झाला होता. हा प्रकार ९ ऑगस्ट रोजीच जिल्हा शल्यचिकित्सकांच्या निदर्शनास आणून देण्यात आला होता. असे असताना तातडीने कारवाई का झाली नाही, असा सवाल उपस्थित होत आहे. जिल्हा शल्यचिकित्सकांनी चौकशी समिती स्थापन करून केवळ कागदी कारवाई न करता दोषी डॉक्टरांवर कठोर कारवाई करावी, तसेच संबंधितांविरुद्ध गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी होत आहे.

## नवनियुक्त शिक्षणाधिकारी यांच्या सत्कारानिमित्त

# उर्दू शिक्षकांच्या प्रश्नांवर सकारात्मक चर्चा

बीड : अखिल महाराष्ट्र उर्दू शिक्षक संघटनेच्या वतीने नवनियुक्त शिक्षणाधिकारी (प्राथमिक) मा. जयश्री चव्हाण मॅडम जिल्हा परिषद बीड यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी बीड जिल्ह्यातील उर्दू माध्यमाच्या शिक्षक व शिक्षण क्षेत्राशी संबंधित विविध प्रलंबित प्रश्नांवर अत्यंत सकारात्मक व सविस्तर चर्चा करण्यात आली.

विशेषतः नेकनूर अध्यापक विद्यालयातील शिक्षकांची कमतरता, माध्यमिक स्तरावरील उर्दू माध्यमाच्या शिक्षकांच्या समायोजनाचा प्रश्न, तसेच गेवराई येथे सुरू असलेल्या बीड जिल्ह्यातील एकमेव उर्दू ज्युनिअर कॉलेजमधील रिक्त पदांची भरती याबाबत संघटनेच्या वतीने ठोस मागण्या मांडण्यात आल्या.

यावेळी संघटनेचे अध्यक्ष काझी मुशाहेद अजीज यांनी उर्दू माध्यमातील शिक्षकांच्या विविध समस्या व प्रलंबित प्रश्न शिक्षणाधिकारी यांच्या निदर्शनास आणून दिले. शिक्षकांची उपलब्धता, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळणे, रिक्त पदे भरणे




आणि उर्दू माध्यमाच्या शैक्षणिक संस्थांना आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून देणे या विषयांवर विशेष चर्चा झाली.मा.शिक्षणाधिकारी मॅडम यांनी संघटनेने मांडलेल्या प्रश्नांची सकारात्मक दखल घेत संबंधित विषयांवर आवश्यक कार्यवाही करण्याबाबत सकारात्मक भूमिका व्यक्त केली. त्यामुळे उर्दू शिक्षकांमध्ये आशावादी वातावरण निर्माण झाले आहे.या वेळी उपशिक्षणाधिकारी मा.अंजुम मॅडम, केंद्रप्रमुख सलमा मॅडम, उस्मान खान सर,मोमीन अलीमोद्दीन सर, मोमीन मोहम्मद खैसर सर, मोमीन जावेद सर, मोमीन साजेद एकबाल, शेख अब्दुल्ला तसेच शेख समीर साहेब यांची विशेष उपस्थिती होती. उर्दू माध्यमाच्या शिक्षकांच्या न्याय्य प्रश्नांसाठी संघटना सातत्याने पाठपुरावा करीत असून, प्रशासनाच्या सकारात्मक भूमिकेमुळे या प्रश्नांना लवकरच योग्य तो न्याय मिळेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.उर्दू माध्यमाच्या शिक्षकांच्या प्रश्नांसाठी संघटना सदैव तत्पर असून, शिक्षक व विद्यार्थ्यांच्या हितासाठी प्रशासनासोबत सकारात्मक संवादातून प्रश्न सोडविण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जातील, असे संघटनेचे अध्यक्ष काझी मुशाहेद अजीज यांनी यावेळी सांगितले.

## एनएचएम भरतीत महाघोटाळा: निविदा बासनात गुंडाळून 'बोगस' भरती; कर्मचाऱ्यांच्या वेतनातून 'कमिशन' वसुलीचा धक्कादायक प्रकार!

नांदेड जिल्हा प्रतिनिधी :-

राष्ट्रीय आरोग्य अभियान आणि १५ व्या वित्त आयोगांतर्गत आरोग्य यंत्रणेत मोठा आर्थिक गैरव्यवहार आणि मनमानी कारभार चव्हाट्यावर आला आहे. 'हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना' आणि नागरी आरोग्य केंद्रांसाठी आवश्यक असलेल्या अटेंडंट व स्वीपर पदांच्या मनुष्यबळ पुरवठ्याची अधिकृत निविदा प्रक्रिया परस्पर गुंडाळून, नियमबाह्य पद्धतीने परस्पर पदे भरल्याचा तसेच या गरीब कर्मचाऱ्यांच्या वेतनातून थेट 'कमिशन' लाटले जात असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे.

या संपूर्ण प्रकरणामुळे आरोग्य वर्तुळात प्रचंड खळबळ उडाली असून, वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या संगनमतानेच हा महाघोटाळा सुरू असल्याचा संशय व्यक्त होत आहे.

निविदा प्रक्रिया केवळ 'फार्स'; उघडलीच नाही टेंडर फाइल!

मिळालेल्या माहितीनुसार, दि. ०५ ऑक्टोबर २०२४ ते दि. १५ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत १५ व्या वित्त आयोगांतर्गत 'आपला दवाखाना' व नागरी आरोग्य केंद्रांसाठी अटेंडंट आणि स्वीपर पुरवठ्याकरिता अधिकृत निविदा प्रसिद्ध करण्यात आली होती. मात्र, प्रशासनातील काही हितसंबंधी घटकांनी या निविदेवर कोणतीही पुढील कायदेशीर कार्यवाही केली नाही. इतकेच नव्हे, तर ही निविदा उघडण्याचे साधे सोपस्कारही पार पाडण्यात आले नाहीत.

शासन निर्णयानुसार ही पदे अधिकृत बाह्यस्रोत एजन्सीच्या माध्यमातून पारदर्शक पद्धतीने भरणे बंधनकारक असताना, नियमांना हरताळ फासत ही पदे परस्पर शासन/प्रशासन स्तरावर भरून मोठा घोळ घालण्यात आला.

खात्यात पगार जमा करायचा आणि कॅश परत घ्यायची: छक्क् च्या अधिकाऱ्यांचे 'कट कमिशन'

या भरती प्रक्रियेतील सर्वात भयानक आणि गंभीर बाब म्हणजे काम करणाऱ्या तृतीय व चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांचे होणारे आर्थिक शोषण!